महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग

# चौथे महिला धोरण - २०२४

**विषयसुची / अनुक्रमणिका :**


| **अ.क्र** | | **विषय** | **पृष्ठ क्र.** |
|---|---|---|---|
| **भाग – १** | | | |
| एक | | संदर्भ | ४ |
| दोन | | सदर धोरणाविषयी | ६ |
| तीन | | धोरणात्मक उपाय योजना आणि धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा | ७ |
| | १. | आरोग्य,पोषण आहार व स्वास्थ्य | **१३** |
| | २. | शिक्षण व कौशल्य | **१७** |
| | ३. | महिलांप्रती होणारा सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे | **१९** |
| | ४. | लिंग समानता पूरक उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे : रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास | **२२** |
| | ५. | लिंग समानता पायाभूत सुविधांचा विकास करणे : परिवहन, गृहनिर्माण व स्वच्छता | **२५** |
| | ६. | लिंग समानता प्रशासन व राजकीय सहभाग | **२८** |
| | ७. | लिंग समानता नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामानबदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन | २९ |
| | ८. | इतर महत्वाची क्षेत्रे | **३१** |
| चार | | संस्थात्मक यंत्रणा | ३६ |
| पाच | | साधनसंपत्तीचे व्यवस्थापन | **३९** |

अनुक्रमणिका : परिशिष्ट


| अ.क. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – आरोग्य, पोषण व स्वास्थ्य | ४१ |
| २. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – शिक्षण व कौशल्य | ८४ |
| ३. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** –महिलांप्रती होणारा सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे | ११० |
| ४. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – लिंग समानता  पूरक उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे : रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास | १५४ |
| ५. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – लिंग समानता   पायाभूत सुविधांचा विकास करणे : परिवहन, गृहनिर्माण व स्वच्छता | १९२ |
| ६. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – लिंग समानता  प्रशासन व राजकीय सहभाग | **२२२** |
| ७. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – लिंग समानता  नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामानबदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन | २३५ |
| ८. | **धोरणात्मक अंमलबजावणी योजना** – इतर महत्वाची क्षेत्रे | २४२ |
| ९. | **वार्षिक कृती आराखडयाच्या सुसूत्रीकरण्यासाठी नमुना**  (कृती संगम आराखडा) | २५७ |

## भाग- १

### १) संदर्भ

लिंग समानता ही भारतीय संविधानाच्या प्रस्तावना, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट आहे.जात, पंथ, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही ओळखीच्या निरपेक्ष सर्व नागरिकांच्या हक्कांचे पालन आणि संरक्षण करणे ही जबाबदारी सरकारची आहे. लिंग समानतेला चालना देणारे कायदे, धोरणे आणि कार्यक्रम विकसित करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार या दोन्हींना अधिकार प्रदान केलेले आहेत.

पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून (१९७४-७८) महिलांच्या समस्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात कल्याणापासून विकासाकडे असे परिवर्तन झाले. राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९० या व्दारे राज्यांना महिलांचे हक्क आणि कायदेशीर हक्कांचे रक्षण करण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा स्थापन करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. भारताचे संविधान (१९९३) ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणेव्दारे पंचायती आणि नगरपालिकांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आणि पंचायतीराज संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% जागा राखीव ठेवणाऱ्या राज्यांपैकी महाराष्ट्र पहिले राज्य होते. सहस्त्रक विकासाची ध्येये (२०००-२०१५) (MDG) यांमुळे लिंग समानता सक्षमीकरणाकडे जागतिक लक्ष वेधले गेले आणि सर्वविकास प्रक्रियांमध्ये “लिंगभाव समानतेचा” समावेश करून त्यास जागतिक विकासाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून मान्यता देण्यात आली. सहस्त्रक विकासाचा ध्येय (MDG) कालावधी पूर्ण होतांना "कोणीही मागे राहता कामा नये “ असे सर्वसमावेशक ध्येय घेऊन जागतिक विकासाची पुढची वाटचाल आखण्यात आली. राष्ट्रीय सरासरीवर आधारित परिणामांवर लक्ष केंद्रित केल्यानंतर सर्वात गरीब आणि सर्वात दुर्बल गटांवर विकासाच्या धोरणांचा इष्ट तो परिणाम झाल्याचे दिसून येत नाही हे प्रकर्षाने जाणवते. ही उणीव भरून काढण्याकरिता २०१५-३० च्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये कोणालाही वगळले जाऊ नये हे उदिष्ट सर्वांगीण सर्वसमावेशक व शाश्वत विकास करण्यासाठीच्या धोरणात समाविष्ट करण्यात आले. मिलेनिअम डेव्हलपमेंट गोल्स (एम.डी.जी.) २०००-२०१५ मुले , मुली आणि महिलांच्या सक्षमीकरणाकडे (एम.डी. जी.३) जागतिक लक्ष वेधले गेले आणि सर्व विकास प्रक्रियांमध्ये लिंगभाव समानता मुलभूत विकास कार्यक्रम म्हणून ओळखला गेला म्हणून शाश्वत विकास ध्येय-५ मार्फत लिंगभाव समानतेचा कार्यक्रम राबवीला जात आहे. सर्वांसाठी समान हक्क मिळवण्याच्या उद्देशाने अनेक आंतरराष्ट्रीय अधिवेशने आणि मानवाधिकार करारांवर भारताने स्वाक्षरी केलेली असल्याने, राज्य आणि केंद्र सरकार महिला व मुली व अन्य लिंगभाव असलेल्या व्यक्तींच्या सुरक्षितता , सुरक्षा आणि मुलभूत समानता सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर दायित्वांशी बांधील आहे.

गरिबीप्रमाणेच लैंगिक असमानता हि एक संरचनात्मक समस्या आहे जी अनेक सामाजिक आणि राजकीय संस्थांद्वारे अनौपचारिक आणि औपचारिक निकष आणि पद्धतींनी बळकट आणि कायम ठेवली आहे. धोरणात्मक उपक्रमाचा उद्देश जरी महिला व मुलींच्या सक्षमीकरणाचा असला तरी लिंग विषमता हा प्रश्न त्यांच्या सामाजिक, खाजगी, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील विकासात अडथळा आणत असतो .परिणामी मुली व महिला विकासाच्या इतर अनेक प्रक्रियांपासून वंचित राहतात. विशेषतः दुर्बल घटकांतील महिला व मुलींच्या विविधांगी असुरक्षिततेमुळे अधिकार, हक्क व समान संधी मिळण्यात आणखी अडथळा निर्माण होतो. जास्त महिलांना अधिकाधिक अनौपचारिक, असंघटित क्षेत्रात राहण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे त्यांना आरोग्य, पोषण व शिक्षण, उत्पादन, मालमत्ता , आर्थिक सेवा, प्रगत कारकीर्द किंवा प्रतिष्ठा,

सुरक्षा व सुरक्षितता यांची सुनिश्चिती करणाऱ्या कामाच्या ठिकाणी मैत्रीपूर्ण वातावरण व मुलभूत गरजांपासून वंचित ठेवले जाते. दारिद्र्याचे चक्र हे लिंगभेदाशी गुंफलेले आहे व त्याचे परिणाम आंतरपिढीय आहेत व त्यासाठी सर्वसमावेशक धोरणात मार्गदर्शन केल्याप्रमाणे तातडीच्या , एकत्रित व दीर्घकालीन कृतींची गरज आहे.

महाराष्ट्र राज्याला सामाजिक सुधारणांचा विशेषतः महिला व मुलींच्या उन्नतीचा प्रदीर्घ इतिहास आहे. ज्यामध्ये राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, राजर्षि शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व विठ्ठल रामजी शिंदे यासारख्या महामानवांचे महत्वाचे योगदान आहे. महाराष्ट्र राज्यात स्त्री हक्क चळवळीला मोठा इतिहास आहे . ज्यामध्ये स्थानिक महिलांचे व महिलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या संस्थांचे विशेष योगदान आहे. अशा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध इतिहासाच्या पार्श्वभूमीवर लिंग समानता व महाराष्ट्राचा सर्वांगीण मानव विकास करणाऱ्या समानता धोरणाची आखणी करण्यात आली आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात महिलांची भूमिका आणि सहभाग वाढवण्यासाठी विविध सरकारांनी धोरणे आणि कार्यक्रम राबवून महिला आणि मुलींसाठी एक सकारात्मक सामाजिक-सांस्कृतिक वातावरण निर्माण केले आहे. महाराष्ट्राने १९९४ मध्ये पहिले महिला सक्षमीकरण धोरण जाहीर केले. २००१ मध्ये दुसरे धोरण प्रसिद्ध झाले, आणि त्यानंतर २०१४ मध्ये तिसरे धोरण आणण्यात आले. अलीकडील काळात महिलांच्या हक्कांसाठी केंद्र व राज्य शासनाने केलेले विविध कायदे जसे की कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम २०१३, शक्ती कायदा, मुलांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२, कुटुंब न्यायालय अधिनियम, समान वेतन कायदा, स्त्रियांचे संपत्तीविषयक विविध कायदे, महिलांना द्यावयाच्या पोटगीबाबत (हिंदू विवाह कायदा, हिंदू दत्तक आणि निर्वाह कायदा) इत्यादी महिलांसाठी असलेल्या कायद्यांमुळे महिलांच्या स्थितीत व जगण्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विशेषतः घरगुती हिंसाचाराच्या घटनांना प्रतिसाद देण्यासाठी उभारण्यात आलेली प्रशासकीय यंत्रणा (जिल्हा/गटस्तरावरील संरक्षण अधिकारी यांची कार्यालये), समुपदेशन केंद्र, सखी केंद्रे (निवारा केंद्रे) इत्यादींचा प्राधान्याने उल्लेख करता येईल. तथापि, लिंग गुणोत्तरात व कामगार वर्गामध्ये महिलांच्या सहभागात सातत्याने होणारी घट, महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ आणि “मी सुद्धा”(MeToo)या चळवळीमुळे उजेडात आलेली प्रकरणे, कामाच्या ठिकाणी होणारे सर्व प्रकारचे शोषण आणि अन्य सामाजिक आर्थिक व जातीय जनगणना २०११ यामधून उघड झालेली अन्य प्रकारची वागणूक ही राज्यातील स्त्री-पुरुष समानता व महिला सक्षमीकरण यांच्या समोरील आव्हाने आहेत. कोविड महामारीतील टाळेबंदीमुळे ही असमानता वाढली व त्यामुळे उपजीविकेचे नुकसान झाले, कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटना, जोडीदाराकडून करण्यात येणारा हिंसाचार, बालविवाह, किशोरवयीन मुलींची शाळेतून गळती, महिलांवरील घरकामाचा वाढत्या भारा मुळे खोलवर रुजलेली नाती बिघडणे आणि सामाजिक गुंतागुंत या सारख्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे.

कोरोना महामारी नंतर मूळ पदावर येण्याचा मार्ग धूसर आणि गुंतागुंतीचा बनला आहे आणि त्याला लिंग समान बनविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. हे धोरण एका निर्णायक क्षणी सादर केले जात असून त्याव्दारे समन्याय रीतीने तात्काळ, मध्यम आणि दीर्घकालीन लाभ होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी तात्काळ आखलेला प्रतिसाद सगळ्यात महत्वाचा असेल. हे धोरण प्रगतीच्या मोजता येण्याजोग्या निर्देशांकांसह धोरणात्मक कृती आराखडा मांडणारे आणि त्यावर जोर देणारे, कृती आराखड्याला चालना देणारी आवश्यक ती संस्थात्मक यंत्रणा सुचविणारे आहे. या निर्देशांकांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्राभिमुखतेची जोपासना करणारे व विभागा-विभागांमध्ये ,समन्वय वाढवणारे संसाधन व्यवस्थापन योजना करणारे हे धोरण यापूर्वीच्या उपक्रमांच्या पुढे टाकलेले एक पाऊल आहे.

## २) सदर धोरणाविषयी

सर्वसाधारणपणे शाश्वत विकास उद्दिष्टे आणि विशेषतः ५ वे शाश्वत विकास ध्येय,राष्ट्रीय महिला धोरण (२०१६ चा मसुदा), महाराष्ट्र राज्य महिला धोरण २०१४, त्याबरोबरच महिलांच्या विरुद्ध सर्व प्रकारच्या भेदभावाचे उच्चाटन करणारा करार (CEDAW), जागतिक मानवाधिकार घोषणापत्र (UDHR) यांसह आंतरराष्ट्रीय करार आणि भारताचे संविधान, भारतीय दंड संहिता (IPC) व केंद्र आणि महाराष्ट्र सरकारचे संबंधित कायदे, धोरणे आणि कार्यक्रम यांना अनुसरून सदर धोरण महिला सक्षमीकरण, समानतेचा सर्वंकष आढावा घेते. महिला व महिलांविषयक होणाऱ्या हिंसाचाराबाबत केंद्र व राज्य शासनाने कायद्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बदलानुसार करावयाची कार्यवाही करण्यात येईल.

## धोरणाचा व्यापक दृष्टिकोन

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना दिलेल्या समानतेच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी लिंगभाव समानतेचा विचार करुन राज्यातील महिला व मुलींना आवश्यक संधी आणि सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि अन्य क्षेत्रातील विकास साधणे.

आरोग्य, पोषण, आहार व स्वास्थ्य, शिक्षण व कौशल्यविकास या बाबतीत महिलांप्रति सर्व प्रकारच्या हिंसाचारास आळा घालणे, महिलांसाठी पूरक रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास इत्यादि उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे. लिंग समानता, पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे (परिवहन, निवारा व स्वच्छतेच्या सुविधा) लिंग समान प्रशासन व राजकीय सहभाग, लिंग समानता आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन तसेच अन्य महत्वाची क्षेत्रे यांचा समावेश करुन महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी समावेशक धोरण तयार करण्यात आले आहे.

हे धोरण तयार करताना महत्वाची क्षेत्रे सुनिश्चित करुन त्यांच्या अंमलबजावणीचा आराखडा तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या महत्वाच्या क्षेत्रांसाठीच्या कृती आराखडयामधील उद्दिष्टे गणनात्मक आहेत.

केवळ कृती आराखडाच नव्हे तर धोरणाच्या अंमलबाजवणीच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे ही या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. अंमलबजावणी व संनियंत्रण समित्या पुढील प्रमाणे आहेत:-

१. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीची (HPC) स्थापना केली जाईल.

२. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय विशेष कृतीदलाची स्थापना केली जाईल.

३. प्रत्येक जिल्ह्याच्या मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हातील महिला विधानसभा सदस्यांचा समावेश करून महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय अंमलबजावणी आणि सुकाणू समितीची (DISC) स्थापना केली जाईल.

**धोरणात्मक अंमलबजावणी योजना खालीलप्रमाणे जोडली आहे -**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आरोग्य, पोषण व स्वास्थ्य | - | परिशिष्ट -१ |
| २. | शिक्षण व कौशल्य | - | परिशिष्ट -२ |
| ३. | महिलांवरील सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे | - | परिशिष्ट -३ |
| ४. | लिंग समानता पूरक उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे : रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास | - | परिशिष्ट -४ |
| ५. | लिंग समानता पायाभूत सुविधांचा विकास करणे : परिवहन, गृहनिर्माण व स्वच्छता | - | परिशिष्ट -५ |
| ६. | लिंग समानता प्रशासन व राजकीय सहभाग | - | परिशिष्ट -६ |
| ७. | लिंग समानता नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामानबदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन | - | परिशिष्ट -७ |
| ८. | इतर महत्वाची क्षेत्रे | - | परिशिष्ट -८ |
| ९. | वार्षिक कृती आराखडयाच्या सुसूत्रीकरण्यासाठी नमुना (कृती संगम आराखडा) | - | परिशिष्ट -९ |

**उद्दिष्टे**

क. महिला व मुलींसाठी आर्थिक आणि सामाजिक धोरणांद्वारे सक्षम वातावरण निर्माण करणे.

ख. महाराष्ट्र राज्यातील सर्व क्षेत्रांमध्ये, संस्थामध्ये समानता आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे, त्यांचे समर्थन मिळविणे व त्यांना प्रेरित करणे.

ग. शासनाच्या सर्व स्तरांवर विकास, नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये समानता आणि महिला सक्षमीकरणाचा दृष्टिकोन मुख्य विचार म्हणून पुढे आणणे.

घ. महिला व मुलींचे नागरी व राजकीय अधिकार जपणे.

ङ. सामाजिक, राजकीय व प्रशासकीय यंत्रणेमध्ये तसेच सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात, महिला सक्षमीकरण व समानता अधिक बळकट करणे. महिला व मुलींच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी पोषक वातावरण तयार करणे.

➢ **विशेष प्राधान्य द्यावयाची क्षेत्रे**

- **समानतेचा विचार मुख्य प्रवाहात आणणे :-** या धोरणामध्ये महिला व मुलींचा बहुआयामी सामाजिक व आर्थिक दर्जा आणि परिस्थिती यांचा विचार करण्यात आलेला आहे. या धोरणात सर्व ठिकाणी कुटुंबाच्या व्याख्येमध्ये एकल महिलांच्या कुटुंबांचाही समावेश केला आहे.
- **कोणालाही मागे न ठेवण्याचा** (LNOB) **दष्टीकोन (सर्वांना सोबत घेण्याचा दृष्टिकोन) :-** हे धोरण असुरक्षित घटकातील महिला व मुलींच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करते आणि परिणामी परस्पर आंतरशाखीय लिंग समानता गरजा मान्य करते. अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती या गटातील महिला आणि मुली, धार्मिक अल्पसंख्याक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, आदिवासी, वनवासी, अंतर्गत विस्थापित व्यक्ती (आयडीपी) आणि प्रकल्पग्रस्त व्यक्ती (पीएपी), शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या विकलांग महिला, ज्येष्ठ महिला, देह विक्रय करणाऱ्या व्यक्ती, बार बाला, संकटग्रस्त महिला, परित्यक्ता, विधवा,सहमतीने सहजीवन (लिव्ह-इन) संबंधांमध्ये असलेल्या महिला, कुमारी / एकल माता, अशांत क्षेत्रातील महिला, सर्व प्रकारच्या हिंसाचारातून वाचलेल्या, ॲसिड हल्ला आणि जाळपोळीतुन वाचलेल्या महिला, आत्महत्येतून वाचलेल्या, सर्व प्रकारच्या व्यसनाधीनतेमधून व्यसनमुक्त झालेल्या स्त्रिया, असंघटित क्षेत्रातील कामगार (घरगुती कामगार, रस्त्यावरील आणि रेल्वेगाड्यांमधील व स्टेशनवरील विक्रेते, शेतमजूर, बांधकाम कामगार, उत्खनन कामगार, वीटभट्टी आणि खाण कामगार, लघूतम, लघू व मध्यम उद्योग यामध्ये सर्वांचा समावेश असलेल्या), स्वच्छता कामगार, माथाडी कामगार, बेघर महिला, लोक कलाकार, दूरचित्रवाणी/चित्रपट कलाकार आणि प्रसार माध्यमातील महिला, न्यायप्रविष्ट असलेल्या, दोषी आणि पूर्वी गुन्हेगार असलेल्या महिला, स्थलांतरित महिला (ऊस तोडणाऱ्या हंगामी कामगारांसह), डोंबारी, ग्रामीण कारागीर (धातूचे, दगडी व इतर काम करणाऱ्या) आणि रस्त्यावर भीक मागणाऱ्या महिला यांच्याकरिता या धोरणात विशिष्ट तरतुदी केल्या आहेत.
- लिंग **समानता एक सामाजिक सुरक्षा कवच :-**कोविड महामारी, मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित महिला व मुलींच्या पुनर्वसनास मदत करण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि कामाच्या क्षेत्रात सामाजिक सुरक्षितता विषयक उपायांना प्राधान्य दिले जाईल.
- **शासनाच्या विविध स्तरावरील धोरणात्मक उपाययोजना :-** या धोरणामध्ये नमूद केलेल्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी राज्य, जिल्हा आणि उपविभागीय स्तरावर कार्यरत विविध यंत्रणाचा समावेश असलेल्या सुयोग्य शासन प्रणाली आणि यंत्रणा तयार केल्या जातील.
- **आर्थिक आणि मनुष्यबळ संसाधन :-** स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी तयार केलेल्या या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वेळेवर आणि पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात येईल.धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावर आवश्यक तितके मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येईल.
- **जबाबदारी निश्चित करणे:** विविध शासकीय विभागांकडून अंमलबजावणी आराखड्यात नमूद केल्यानुसार हे धोरण तपशीलवार कृती योजनेत नमूद स्पष्ट कृती करण्यायोग्य भूमिका, जबाबदाऱ्या आणि संनियंत्रण निर्देशांकांसह कालबद्ध आणि पद्धतशीरपणे अंमलात आणले जाईल.

## ➢ मसुदा तयार करण्याचा दृष्टिकोन

या धोरणास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाल विकास विभागाच्या मा. मंत्री यांनी दिशादर्शकाची भूमिका निभावली आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली विभागाचे सचिव, महिला व बाल विकास विभाग, आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे व उपायुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी संपूर्ण कार्यपद्धतीला चालना दिली आहे. या धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेस मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. सभापती विधानपरिषद, मा. उप सभापती विधानपरिषद तसेच मंत्रीमंडळातील मा. मंत्रीगण/ मा. राज्यमंत्रीगण तसेच राज्यातील मा. संसद सदस्य व मा. विधि मंडळ सदस्य यांनी देखील मोलाचे साहाय्य केले आहे. याशिवाय आघाडीचे मानव विकास तज्ज्ञ, महिला हक्कांचे पुरस्कर्ते, शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, वरिष्ठ पोलीस अधिकारी,राज्य महिला आयोगाच्या पदाधिकारी / अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळाचे पदाधिकारी / अधिकारी, विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क व कल्याण समितीचे पदाधिकारी / अधिकारी, राज्य शासनाच्या विविध विभागांमधील वरिष्ठ अधिकारी यांच्यासह या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध गटांशी केलेल्या व्यापक चर्चेतून तयार केले गेले आहे.

धोरणाच्या मसुदा निर्मितीसाठी राज्यस्तरीय कृती दल/ मसुदा समिती स्थापन करण्यात आली. या समितीने पूर्वीच्या धोरणांवरून आणि नवीन समस्यांवर आधारित, मूळ विषयाची क्षेत्रे शोधली. त्या त्या विषयामधील तज्ञांचा, कार्यक्षेत्रातील व्यावसायिकांचा आणि सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या उप-गटांची स्थापना करण्यात आली. या गटांना विषयनिहाय महत्त्वाच्या बाबी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यानुसार धोरणात्मक तरतुदी शोधण्यात आल्या. विषयांनुसार प्रत्येक उपगटाला अंमलबजावणीची निश्चित कालमर्यादा नमूद असलेला, संनियंत्रणाचे निर्देशांक आणि राज्य शासनाच्या विविध विभागांकडून अपेक्षित असलेली कृती स्पष्ट करणारा, त्या मागचा व्यापक दृष्टिकोन दर्शवणारा, एक संक्षिप्त मसुदा तयार करण्याबाबत सूचित केले गेले. यासाठी धोरणातील सूचना आणि कृती योजने बाबत तांत्रिक आणि दस्ताऐवजांची मदत संयुक्त राष्ट्र बाल विकास निधि (UNस्थानिक समिती EF) आणि संयुक्त राष्ट्रांचे महिला संघटनांनी (UN WOMEN) व इतर महिला संघटनांनी केली.

**धोरणात समाविष्ट करण्यात आलेले महत्वाचे  विषय (THEMAT AREA) पुढील प्रमाणे आहेत –**

**भाग – १**

१. आरोग्य, पोषण आहार व स्वास्थ्य.
२. शिक्षण व कौशल्य.
३. महिलांप्रति सर्व प्रकारच्या  हिंसाचारास आळा घालणे.
४. लिंग समानता  पूरक उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे : रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास.
५. लिंग समानता  समावेशक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे : परिवहन,निवारा व स्वच्छता विषयक सुविधा.
६. लिंग समानता  प्रशासन व राजकीय सहभाग.
७. लिंग समानता  नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामानबदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन.
८. इतर महत्वाची  अन्य क्षेत्रे.

**धोरणातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी निर्धारित केलेली कालमर्यादा (**Time Frame**)**

अल्प कालावधी– ६ महिने ते १ वर्ष

मध्यम कालावधी – १ वर्ष ते **३** वर्ष

दीर्घ कालावधी – ३ वर्ष ते ५ वर्ष

**अंमलबजावणी व त्याबाबतचा आढावा**

प्रकरण ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे या धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. विविध पातळींवर घेतल्या जाणाऱ्या आढाव्याअंती समोर येणारे तथ्य, निष्कर्ष यावर आधारित नियमित उपाययोजना केल्या जातील. थोडक्यात हे धोरण लवचिक आहे. त्यात गरजेनुसार व कालानुरूप आवश्यक ते बदल करता येतील. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाच्या प्रत्येक विभागाने इतर संबधित विभागांशी समन्वय साधून वार्षिक कृती आराखडा (जोडपत्र **९**)  विहित नमुन्यात उच्च स्तरीय समितीला वेळोवेळी सादर करणे अपेक्षित आहे. विशेष कृतीदल या आराखड्याचा आढावा घेऊन गरजेनुसार शासनास शिफारशी करील.

**३) धोरणात्मक उपाय योजना आणि धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा**

**१. आरोग्य, पोषणआहार व स्वास्थ्य.**

**धोरणात्मक उपाय योजना**

१.१ स्त्रिया व मुलींसाठी दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांची सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित केली जाईल. यामध्ये महामारी, नैसर्गिक आपत्ती आणि इतर मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितींचा समावेश आहे. त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी एकात्मिक कृती करण्यात येईल आणि प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि पुनर्वसन सेवांचा विस्तार करण्यासाठी ठोस कार्यवाही केली जाईल. महिला व मुलींच्या आरोग्य आणि विकासासाठी, कुटुंबांचा आणि विशेषतः मुलांचा व पुरुषांचा सहभाग घेण्याकरिता प्रयत्न केले जातील.

१.२ सर्व आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्य आणि विकासाच्या सर्व पैलूंसाठी समाजातील सर्वात असुरक्षित गटातील व्यक्तींच्या गरजांना प्राधान्य दिले जाईल.

१.३ महिला व मुलींच्या आरोग्याचा दर्जा वृद्धिंगत करण्यासाठी आणि सुस्थितीत राखण्यासाठी शासकीय विभागांमध्ये आंतर-क्षेत्रीय (Intersectoral) समन्वय, वर्तणुकीत बदल घडविणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी विशेष गुंतवणूक करण्याच्या तरतुदी केल्या जातील. यामध्ये आरोग्याच्या दर्जावर प्रभाव टाकणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल.

१.४ लिंग समानता आरोग्याचे धोरण तयार करून त्यामध्ये लैंगिक व प्रजनन स्वास्थ सेवा सर्वांना सहज उपलब्ध होतील असे नियोजन करणे गरजेचे आहे. आरोग्याच्या सुधारित सर्वसमावेशक धोरणामध्ये मातृत्व , प्रसूतिपूर्व आणि प्रसवोत्तर सुधारित आरोग्य सेवा आणि शुश्रुषा, तसेच दुर्गम भागात सेवा पोहचविणे, मासिक पाळी दरम्यानची स्वच्छता, प्रसूती समयी माता मृत्यू दर कमी करण्यासाठी यंत्रणा, अल्पवयीन मुलींमधील गर्भधारणे संबंधी आवश्यक आरोग्य सेवा, संदर्भ व अत्यावश्यक प्रसूती आरोग्य सेवांसाठी वाहतूक व्यवस्था, लिंग निर्धारणाला आळा घालणे, पुरुष नसबंदी इ. बाबींचा समावेश करण्यात येईल. सहायक प्रजोत्पादन गर्भधारणा (IVF) व प्रतिस्थापित गर्भधारणा (surrogacy) सारख्या प्रक्रियांमध्ये आवश्यक मातृत्व, प्रसुती, प्रसवोत्तर उपचार, समुपदेशन व इतर आरोग्य सेवा प्रदान केल्या जातील. प्रसूतीनंतर म्हणजेच बाळाचा जन्म झाल्यानंतर महिलांमध्ये अनेक शारिरीक आणि मानसिक बदल होतात. शारीरिक बदलांमुळे महिलेची मानसिक स्थिती खालावते. यामुळे नैराश्य येते, यालाच 'पोस्टपार्टम डिप्रेशन' म्हणजेच प्रसूतीपश्चात नैराश्य असं म्हणतात. महिलांच्या शरीरात गरोदरपणापासून ते प्रसूतीदरम्यान अनेक बदल होतात. याचा परिणाम महिलांच्या मानसिक आरोग्यावर होतो. या काळात महिलांची संप्रेरके असंतुलित असतात. यामुळे महिलांना शारीरिक आणि मानसिक समस्यांचा सामना करावा लागतो.

१.५ महिलांना गर्भपात करण्यासाठी सुरक्षित, उच्चप्रतीच्या व पुरेशा सेवा सुलभतेने उपलब्ध होतील असे नियोजन करणे गरजेचे आहे. महिला व मुलींसाठी सुधारित, सोपी आणि परवडणारी गर्भनिरोधक साधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

१.६ रजोनिवृत्ती व त्यासंबंधित समस्या, अनियमित मासिक पाळी व त्या संबंधित आजार (PCOS/PCOD), अंतःस्रावी विकार, कर्करोग (अंडाशय, गर्भाशय व स्तन), मूत्र मार्ग संक्रमण (UTIs), उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, कॅल्शिअम प्रोटीनच्या कमतरतेमुळे निर्माण झालेला हाडांचा ठिसूळपणा (अस्थिसूचिरता), हृदय व रक्तवाहिन्या संबंधी रोग, क्षयरोग, एचआयव्ही/एड्स (HIV/AIDS) इत्यादींशी संबंधित महिला आणि मुलींच्या दुर्लक्षित आरोग्यसेवेच्या गरजांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य अशा दोन्ही आजारांना प्रतिसाद देणाऱ्या पर्याप्त आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी विविध यंत्रणामध्ये आवश्यक समन्वय साधला जाईल.

१.७ ज्येष्ठ नागरिकांकरिता राष्ट्रीय धोरण, २०११ च्या अनुषंगाने महिलांसाठी वृद्धोपचार आरोग्य सेवा प्रदान केल्या जातील. सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या योग्य सहभागाने वृद्धांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि पुनर्वसनाच्या आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

१.८ राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण, २०१४ नुसार ग्रामीण, आदिवासी आणि शहरी भागात प्राथमिक स्तरापासून महिला व मुलींच्या मानसिक आरोग्यासाठी आवश्यक निदान, काळजी आणि दर्जेदार उपचार प्रदान करण्यासाठी एक कालबद्ध दृष्टीकोन ठेऊन योजना तयार केली जाईल.

१.९ समुदाय व पंचायत व नगर पालिका स्तरावर दिव्यांग महिला व मुलींसाठी सर्वांगीण उपचार आणि आरोग्य सेवा देण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

१.१० राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या अनुषंगाने महिला व मुलींसाठी अन्न आणि पोषण सुरक्षा प्रदान करणे, हा या धोरणाचा महत्वाचा भाग आहे. या दृष्टीने आरोग्य सेवा प्रणाली, सार्वजनिक वितरण प्रणाली, एकात्मिक बाल विकास सेवा योजना व इतर धोरणे आणि कार्यक्रम या सर्व उपाय योजनांमध्ये समन्वय साधण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.

१.११ दुर्गम भागात राहणाऱ्या किशोरवयीन मुली, गरोदर आणि स्तनदा महिला यांच्या पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी एकात्मिक उपाययोजना केल्या जातील ज्यामध्ये रक्तक्षय असलेल्या, कमी वजन निर्देशांक असलेल्या, सिकल सेल ग्रस्त, कुपोषण इत्यादी ग्रस्त मुली व महिलांकडे विशेष लक्ष दिले जाईल. मुली व महिलांना पोषण व पूरक आहार देण्याकरिता महिला स्वयं साहाय्यता समूहांची उत्पादन, वितरण आणि सनियंत्रणामध्ये प्राधान्याने मदत घेतली जाईल.

१.१२ आरोग्य विम्याच्या राष्ट्रीय व राज्य आरोग्य विमा योजनांच्या विस्तारावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषत:राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना, प्रधान मंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना याशिवाय असुरक्षित आणि दुर्लक्षित गटातील महिलांना फायदा होईल अशा एकात्मिक बाल विकास सेवा

योजना, जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय शहरी उपजीविका योजना व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) संचलित कार्यक्रमांशी ते जोडले जाईल.

१.१३ साहाय्यक परिचारिका (ANM), अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा ताई, यांच्यासह अग्रणी (frontline) कर्मचारी आणि आरोग्य सेवक व सहयोगी कामगारांचा क्षमता विकास आणि त्यांच्यासाठी कामाच्या ठिकाणचे वातावरण सुधारण्याचे प्रयत्न केले जातील.

१.१४ मादक द्रव्यांचा दुरुपयोग रोखण्यासाठी आणि व्यसनमुक्ती साठी एक व्यापक राज्यस्तरीय कृती आराखडा जेन्डर समानता दृष्टिकोनातून तयार केला जाईल. या दृष्टीने प्रतिबंध, उपचार, दीर्घकालीन पुनर्वसन, आणि वर्तनातील बदल यासाठी योग्य संस्थात्मक यंत्रणा विकसित करणे गरजेचे आहे.

१.१५ महिला व मुलींवर लक्ष केंद्रित करणाऱ्या आरोग्य समस्यांवरील विभिन्न माहितीचे संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी पुरेसे प्रयत्न करणे गरजेचे आहे. लिंग समानता दृष्टिकोनातून आरोग्य संबंधित धोरणांची माहिती आणि विस्तार करण्यासाठी आवश्यकतेनुसार संशोधन आणि अभ्यास केले जातील.

१.१६ मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्यात “लेक लाडकी योजना” सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

१.१७ पिवळे रेशन कार्ड धारक महिलांना शासकीय रुग्णालयात मोफत उपचार देण्यात येतील.

१.१८ काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी अद्यावत पाळणाघर सुरु करणे काळाची गरज आहे .त्यासाठी केंद्र शासनाची पाळणाघर या योजनेची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यात येईल .महिलांची संख्या जास्त असलेल्या आस्थापनाच्या ठिकाणी मागणीनुसार पाळणाघर सुरु करण्यात येतील .

१.१९ असंघटित क्षेत्रात, निमशासकीय किंवा खाजगी रोजगार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी प्रसूती रजा महत्त्वाची आहे. नवजात मुलांच्या मातांना आधार देण्यासाठी, सरकार पुरुष कर्मचाऱ्यांसाठी पितृत्व रजेचा पर्याय विचारात घेऊ शकते. सरकारने निमशासकीय आणि खाजगी क्षेत्रातील संस्थांना त्यांच्या संबंधित HR धोरणामध्ये मातृत्व आणि पितृत्व रजेची तरतूद करण्यासाठी प्रोत्साहित करेल.

सरकार खालील मुद्यांचा विचार करेल:

· घरून काम (Work from Home) पर्यायाचा वापर
· असंघटीत/ खाजगी क्षेत्राच्या मदतीसाठी अनुकूल कल्याण निधीची स्थापना करणे
· सिंगापूर सारख्या मॉडेलचा विचार करता येईल, जिथे सरकार प्रसूती रजेचा आर्थिक भार उचलते
· संघटीत/ खाजगी क्षेत्राच्या फायद्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली मातृत्व निधी तयार करण्याची शक्यता तपासणे

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-१ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

## २. शिक्षण व कौशल्य :

### धोरणात्मक उपाय योजना

२.१ शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ आणि नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने, महिला व मुलींसाठी दर्जेदार शिक्षणासाठी सार्वत्रिक प्रवेशाची सुनिश्चिती केली जाईल. शिक्षण व रोजगार क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी सर्व स्तरांवर लिंग समान अभ्यासक्रम व पायाभूत सोयीसुविधा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची महिलांप्रतीची संवेदनशीलता वाढविण्याचे प्रयत्न केले जातील.

२.२ उपेक्षित समुदायातील महिला व मुली, अल्पसंख्याक धर्माच्या लोकांना, वेश्या व्यवसायी आणि दिव्यांग व्यक्तींना औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी पर्यायी अध्यापन पद्धती वापरून नाविन्यपूर्ण आणि सहज उपलब्ध होतील अशा योग्य शिक्षण पद्धतीचा लाभ दिला जाईल. किशोरवयीन मुलींची शाळांमध्ये नावनोंदणी आणि त्यांचे सातत्य टिकवून ठेवण्यास प्राधान्य दिले जाईल आणि गळतीची मूळ कारणे दूर केली जातील. प्रामुख्याने असंघटित मजूर - महिला आणि स्थलांतरित जिथे मजुरी करतात अशा मोठ्या बांधकाम योजना, मिठागर क्षेत्र, कारखाने व इतर उत्पादन क्षेत्रे या ठिकाणांवर शिक्षणाच्या व अध्ययनाच्या सुधारित सेवा पुरविण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात येतील. आदिवासी मुलींच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावण्यासाठी आदिवासी शाळा मुली शैक्षणिक प्रोत्साहन योजनेच्या तरतुदीचा विचार केला जाईल. यामुळे त्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यात येणाऱ्या अडथळ्यांचे निराकरण करण्यास मदत होईल, शालेय शिक्षण सुरू ठेवण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहन देण्यात येईल.

२.३ असुरक्षित घटकांतील व्यक्तींच्या शिक्षणाच्या गरजा आणि भाषिक विविधतेची पूर्तता करणारा सर्वसमावेशक अभ्यासक्रम आणि अध्यापन शास्त्रे यांचा विकास करण्यात येईल. दुर्गम आणि अति दुर्गम भागातील महिला व मुलींना शिक्षण सहजपणे उपलब्ध व्हावे यासाठी अनुकूल शिक्षण माध्यमाला प्रोत्साहन दिले जाईल. मुक्त शाळा, रात्रशाळा, सेतू पाठ्यक्रम, अनौपचारिक शिक्षण पद्धती या सहपर्यायी शिक्षण प्रारूपांचा वापर करून आजीवन शिक्षणाला चालना दिली जाईल.

२.४ कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रत्येक क्षेत्राच्या विशिष्ट गरजा आणि सामर्थ्यांनुसार तयार करण्यासाठी सरकार राज्याचे औद्योगिक झोनमध्ये वर्गीकरण करेल. अशा वर्गीकरणामध्ये साक्षरता पातळी आणि महिलांच्या स्थलांतरण पद्धती यांसारख्या घटकांचा विचार केला जाईल. या पर्यायांच्या मदतीने, कौशल्य विकास कार्यक्रम तयार केले जातील जे प्रत्येक क्षेत्राच्या विशिष्ट मागण्यांशी जुळतील. हा दृष्टिकोन राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमाची जास्तीत जास्त परिणामकारकता वाढवेल.

२.५ कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास (प्रतिबंध,प्रतिषेध व निवारण) (POSH) अधिनियम २०१३ मधील तरतुदींच्या अनुषंगाने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये लैंगिक छळाला संपूर्ण पायबंद घालण्यासाठी उचित नियम व विनियम अंमलात आणले जातील.लैंगिक गैरवर्तनाच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि निवारण्यासाठी पुरेशी

यंत्रणा निर्माण करण्यात येईल. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लैंगिक छळाशी संबंधित समस्यांचे निराकरण करता यावे यासाठी सबंधित कायद्यांबाबत संवेदनशील बनवण्यात येईल.

२.६ मुलींना माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण स्तरावर विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित, क्रीडा, व्यावसायिक शिक्षण, ललित कला, इत्यादी क्षेत्रात त्यांचा प्रवेश वाढविण्यावर भर देऊन त्यांना विविध अभ्यासक्रमांचे पर्याय निवडता येणे शक्य व्हावे म्हणून विशेष तरतुदी करण्यात येतील व त्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल.

२.७ मुली आणि महिलांना उच्च व तांत्रिक शिक्षण तसेच संशोधन क्षेत्रामध्ये राखीव जागा, शिष्यवृत्ती आणि इतर साहाय्य देऊन विविध क्षेत्रांमध्ये त्यांच्या शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण केले जाईल. ऑनलाईन शिक्षण, दूरस्थ व मिश्र शिक्षण पद्धती वापरून महिला व मुलींसाठी आघाडीच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी नावीन्यपूर्ण भागीदारीकरून उच्च शिक्षणातील वैविध्यपूर्ण शिक्षणाच्या संधींचा विस्तार केला जाईल.

२.८ शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारित केलेल्या मानकांचे अनुपालन करून सार्वजनिक आणि खाजगी संस्थांसह शिक्षण आणि अध्ययनाच्या सर्व स्तरांवर लिंग समानता  समावेशक पायाभूत सुविधा सुनिश्चित केल्या जातील.

२.९ शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आणि माध्यमांमध्ये लैंगिक शिक्षण, संमती, कुटुंबव्यवस्था  आधारित संबंध, सांस्कृतिक वैविध्य आणि सर्वसमावेशकता, व्यक्ती-व्यक्तींमधील सबंध, संवाद कौशल्य  नेतृत्व, डिजिटल साक्षरता आणि वित्तीय साक्षरता इत्यादी विषयांचा अंतर्भाव करून  व्यापक जीवन कौशल्य अभ्यासक्रमाचे एकात्मीकरण केले जाईल.

२.१० विद्यमान राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास,रोजगार आणि उद्योजकता कार्यक्रमांचे  एकत्रीकरण करून कौशल्य विकास, व्यवसाय समुपदेशन आणि महिला व मुलींच्या  रोजगारक्षमतेवर अधिक भर दिला जाईल.

२.११ शिकवणी वर्ग व इतर संस्था यांसह सर्व सार्वजनिक व खाजगी मालकी असलेल्या व त्यांनी चालविलेल्या सर्व शैक्षणिक संस्था या धोरणाचे संपूर्णपणे पालन करतील यासाठी योग्य नियम व विनियम आखून त्याची अंमलबजावणी अनिवार्य केली जाईल.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-२ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

## ३. महिलांप्रती सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे.

### धोरणात्मक उपाय योजना

३.१ मुली आणि महिलांना खाजगी व सार्वजनिक जीवनात, कार्यालयात व समाज माध्यमांतून (online) विविध प्रकारच्या हिंसाचारापासून व गैरवर्तणूकीपासून मुक्त जीवन जगता येईल याची खात्री केली जाईल. महिलांवरील सर्व प्रकारच्या हिंसाचारास (SGBV) प्रतिबंध करणाऱ्या आणि तो संपुष्टात येईल अशा पद्धतीच्या नाविन्यपूर्ण, बहुक्षेत्रीय धोरणांची रचना तयार करण्यात येईल व त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. विशेषत: पुरुष आणि मुलांचा सहभाग असलेल्या जाणीव जागृतीच्या कार्यक्रमांद्वारे अनिष्ट सामाजिक प्रथा आणि सांस्कृतिक पद्धतींना दूर करणे इत्यादींचा समावेश या धोरणात आहे.

३.२ बलात्कार, घरगुती हिंसा, जवळच्या सहकाऱ्याकडून झालेली हिंसा, हुंडा पद्धती, देवदासी प्रथा, बाल विवाह, जबरदस्तीने वेश्याव्यवसायास भाग पाडणे, महिलांच्या जननेंद्रियाचे विच्छेदन (खतना), सन्मान जपण्यासाठी केलेली हत्या (ऑनर किलिंग), अंधश्रद्धा, कौमार्य चाचणी, डाकीण प्रथा, मानवी तस्करी, वेठबिगारी, जाती आधारित अत्याचार आणि भेदभाव, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, ॲसिड फेकणे, तसेच दिव्यांग, (विधवा,विभक्त झालेल्या, परित्यक्ता महिलांचा) शारीरिक व मानसिक छळ दीर्घकाळ चालत आलेल्या महिलांप्रतीच्या हिंसाचाराचे दृश्य व अदृश्य प्रकार रोखण्यासाठी विविध क्षेत्रातील व्यक्तींमध्ये संवेदनशीलता व जाणीव जागृती निर्माण केली जाईल.

३.३ सर्व प्रकारच्या हिंसाचारातून वाचलेल्या मुली आणि महिलांना तात्काळ व सातत्यपूर्ण संरक्षण मिळावे, त्यांना न्याय मिळावा व त्यांचे दीर्घकालीन पुनर्वसन व्हावे यासाठी सर्वसमावेशक साहाय्यता प्रणालीद्वारे वैद्यकीय व मानसोपचार सेवा, समुपदेशन सेवा, विधि साहाय्यता, दुभाषिक व अनुवाद सेवा, २४/७ मदत केंद्रे (helpline), निवारा व आर्थिक साहाय्य मिळण्याकरिता एकात्मिक प्रतिसाद देण्यात येईल व प्रणालीच्या विविध भागांमध्ये समन्वय साधुन सुविधा पुरविण्यात येईल.

३.४ सर्व सार्वजनिक आणि खाजगी संस्थांमध्ये उचित कार्यवाही करून सर्व स्तरांवर महिलांप्रतीच्या संवेदनशीलतेची आणि महिलांवरील हिंसाचाराच्या सर्व कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास पाठिंबा देण्यात येईल व तसे प्रयत्न केले जातील. महिला आणि मुलींवर होणारे हिंसाचाराचे सर्व प्रकार नष्ट करण्यासाठी उचित यंत्रणा स्थापित करुन प्रशासकीय यंत्रणेचे बळकटीकरण करण्यात येईल. पीडित-केंद्रित (survivor-centric response) प्रतिसादाचा दर्जा राखण्याकरिता निरंतर प्रशिक्षण, पर्यवेक्षण आणि नियतकालिक आढावा घेण्यात येईल.

३.५ महिलांवरील सर्व प्रकारच्या हिंसाचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये त्वरित न्याय देण्यासाठी, कौटुंबिक आणि दिवाणी न्यायालये, पोलीस ठाणे, बालके व महिलांसाठीचे विशेष कक्ष, औद्योगिक न्यायालये, निर्भया पथके, मान्यता प्राप्त समुपदेशन केंद्रे आणि राज्य महिला आयोग इ. संस्थात्मक यंत्रणांचे बळकटीकरण करण्यात येईल. आवश्यकतेनुसार गंभीर व अघोरी तसेच महिलांवरील सर्व प्रकारच्या हिंसाचाराशी (SGBV) संबंधित गुन्ह्यांच्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्यात येतील.

३.६ हिंसाचाराला प्रतिबंध करण्यासाठी व जेन्डर समानता प्रतिसादी कार्यवाही होण्यासाठी संपुर्ण क्षेत्रातील अधिकारी, तेथील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना सेवापूर्व व सेवेच्या दरम्यान सर्वसमावेशक, मान्यताप्राप्त तसेच दर्जेदार प्रशिक्षण दिले जाईल. प्रथम प्रतिसाद देणारे (First Responders), पोलीस,न्यायसाहाय्यक कर्मचारी (Forens personnel), न्यायिक आणि आरोग्य सेवा पुरविणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जेन्डर समानता संवेदनशीलते बरोबर संरक्षण अधिकारी यांची प्राधान्याने नेमणूक केली जाईल व त्यांना प्रशिक्षण देण्यावर भर दिला जाईल.

३.७. सांप्रदायिक हिंसा, बंड, राजकीय उद्रेक, सामाजिक अस्थिरता व तत्सम संघर्षाच्या परिस्थितीत सापडलेल्या महिला व मुलींच्या संरक्षणासाठी, मदतीसाठी व त्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष धोरणात्मक पावले उचलली जातील.

३.८ महिलांवरील हिंसाचाराशी संबंधित गुणात्मक आणि संख्यात्मक दर्शकासह एक बळकट **माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)** व **संनियंत्रण आणि मूल्यमापन प्रणाली (M&E)** स्थापित केली जाईल. महिलांवरील हिंसाचाराचे प्राबल्य, प्रभावी प्रतिसाद व पुनर्वसनाचे परिणाम समजावून घेण्याकरिता माहितीचे नियमित विश्लेषण आणि संशोधन केले जाईल. **संनियंत्रण आणि मूल्यमापन प्रणालीमध्ये** (M&E) महिला व मुली, स्थलांतरित, शाळा सोडलेल्या, मानव अपव्यापारातून तसेच बाल विवाह आणि इतर लैंगिक गुन्हेगारीमधून वाचलेल्या अशा असुरक्षित महिला व मुली, तसेच हरवलेल्या महिला आणि मुलींवर लक्ष केन्द्रित करण्यात येईल. सराईत गुन्हेगार व महिलांवरील हिंसाचाराची अतिव्याप्त क्षेत्रे निश्चित करण्यासाठी एकत्रित माहिती संचय (Data Base)तयार केला जाईल.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-३ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

### ४. लिंग समानता पूरक उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे : रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास

**धोरणात्मक उपाययोजना**

४.१ महिलांच्या प्रगत आर्थिक सशक्तीकरणासाठी, राज्य वित्तीय धोरणांमध्ये समानता आणणे, त्यांना वित्तीय तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, उद्योजकता व इतर उपजीविकेच्या योजनांची सुधारित अंमलबजावणी करणे, इ. बाबीसाठी प्रयत्न केले जातील. यात महिला कुटुंब प्रमुख असणाऱ्या घरांकरिता, विशेषत: कृषि क्षेत्रावर येणाऱ्या नैसर्गिक व मानवी संकटांमुळे, कोविड मुळे पीडित झालेल्या महिला किंवा परित्यक्त्या, सोडून दिलेल्या महिला यांना रोजगार मिळण्यासाठी विशेष उपाय योजना हाती घेण्यात येतील.

४.२ महिलांच्या श्रम शक्तींस योग्य संधी देणे, समुचित धोरणात्मक व उपाय योजनांद्वारे विविध कामगार कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीस प्रोत्साहन देणे. महिलांचा रोजगार क्षेत्रात सहभाग वाढविणे, कामासाठी पोषक वातावरण तयार करणे, प्रगतीच्या समान संधी देणे,वाजवी व समान वेतन, सुरक्षितता व व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्याच्या सोयी सुविधांद्वारे, पारंपारिक क्षेत्रासह नवीन तसेच उदयोन्मुख अशा सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे यांसह दूरसंचार क्षेत्र, माहिती व तंत्रज्ञान, पायाभूत सोयी सुविधा, नव उद्यमी संस्था आणि वित्तीय सेवांमध्ये महिलांच्या सहभागास प्रोत्साहन दिले जाईल. ज्यात प्रामुख्याने महिला काम करत आहेत अशा महिला वर्गाच्या क्षेत्रातील कौशल्ये व विशेष कामकाजात प्रोत्साहन देऊन त्यांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येईल. खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये ३०% पेक्षा जास्त महिलांची संख्या असल्यास त्या उद्योगांना प्रोत्सहनात्मक सवलती देण्याचा विचार करण्यात यावा

४.३ राष्ट्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण २०१५ व महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण नवउद्यमी (स्टार्टअप) धोरण २०१८ नुसार पारंपारिक, नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रातील सर्व कौशल्य आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये महिलांचा प्राधान्याने समावेश करण्यात येईल. महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या व इतर विनामोबदला कामाच्या भाराची विशेष दखल घेऊन तसेच, कोव्हीड काळात रोजगाराची साधने गमावलेल्या महिलांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. वन, पशुधन, कुक्कुटपालन आणि मत्स्यपालनाच्या बरोबर उत्पादन व तंत्रज्ञानाच्या सेवा क्षेत्रात तसेच असुरक्षित गटातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना आधुनिक कौशल्ये दिली जातील. कंत्राटी महिला कामगार, अनैतिक व्यापारातून सुटका झालेल्या महिलांबरोबरच एचआयव्ही/एड्स बाधित महिला, दिव्यांग, देवदासी, बलात्कार पिडित, ॲसिड हल्ला आणि हिंसाचाराने पीडित महिला, आरोपी, गुन्हा सिद्ध झालेल्या महिला, वेश्या व्यवसाय करणाऱ्या आणि समाजातील इतर वर्गातील उपेक्षित महिला यांच्याकरिता कौशल्य विकासावर भर दिला जाईल.

४.४ विविध शासकीय विभागांच्या वैयक्तिक लाभांच्या योजनेमध्ये महिलांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा .त्या सोबतच आरोग्य- स्वास्थ्य, बँकिंग व वित्तीय सेवा, ई-कॉमर्स, कृषि क्षेत्र व संबंधित सेवा देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (artificial intelligence) आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात त्यांच्या उद्योजकता व नवोपक्रमतेवर भर दिला जाईल.

४.५ बँक व इतर  वित्तीय संस्थामार्फत कर्जाची व इतर आर्थिक सेवांमध्ये प्रवेशाची संधी देऊन प्रचलित असमानता आधारित दरी भरून काढण्याकरिता महिलांना प्राधान्य देण्यासाठी तसेच वंचित प्रवर्गातील महिलांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन त्यांना प्राधान्याने आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

४.६ महिलांच्या स्थानिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवर आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या महिलांच्या संस्था अशी ओळख निर्माण करण्यासाठी स्वयं साहाय्यता गट पुन:प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले जातील. महिला गटांना व संघाना संघटनात्मक उभारणी आणि महिलांप्रती समानता प्रस्थापित करुन मुख्य प्रवाहात आणण्याच्या  दृष्टीने संस्थात्मक साहाय्य आणखी वाढविण्यात येईल. तसेच महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालासाठी ब्रॅन्डीग चे प्रशिक्षण देण्यात येईल, राज्य सरकार, सरकारी वितरण योजना, MDM, शालेय गणवेश बनविणे आणि इतर व्यवसायांमध्ये महिला स्वयंसहाय्यता गटांना प्रोत्साहन देण्यात येईल. महानगरपालिका/नगरपालिका मधील प्रभागांमध्ये महिला बचत गटांना स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा विचार करण्यात यावा

४.७ कृषि क्षेत्रातील महिलांची शेतकरी व  विविध उत्पादन साखळयामध्ये इतर व्यावसायिक म्हणून ओळख प्रस्थापित करून त्यांचा शेत जमिनीवर व इतर उत्पादक मालमत्तेवर ताबा व मालकी मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ बनविण्यात येईल. कृषि क्षेत्राशी संबंधित योजनांचा लाभ मिळवून देण्यावर नियंत्रण मिळवण्यात व निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका वाढविण्यावर हे धोरण भर देईल. महिलांची कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका आहे विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची, परंतु त्यांच्या वापरण्यास सोपी आणि योग्य यंत्रसामग्री उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अनेकदा आव्हानांना सामोरे जावे लागते. स्त्री-अनुकूल कृषी यंत्रे तयार करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन दिले जाईल कारण हे लिंग-सर्वसमावेशक कृषी विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

४.८ कृषि मालाचे उत्पादन, कृषि मालावर प्रक्रिया करणे, साठवणूक, वाहतूक व कृषि उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरिता शेतकरी महिलांचे संघ/ विद्यमान महिला संघटना / महिला सहकारी संस्थांना संस्थात्मक तसेच वित्तीय संस्थांमार्फत आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच महिलांना वाहन चालक परवाना नि:शुल्क उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

४.९ बार नर्तिका, लोक कलाकार (डोंबारी, कोल्हाटी, तमासगीर इ.), बांधकाम आणि इतर श्रमिक कामगार, घरगुती कामगार, ऊस तोडणी कामगार यासारख्या असंघटित क्षेत्रांमध्ये कार्यरत महिलांना  कामाच्या अनौपचारिक स्वरूपामुळे लैंगिक अत्याचाराला  बळी पडावे लागते, याची दखल घेऊन त्यांना योग्य अशी एक संस्थात्मक ओळख मिळवून देण्यासाठी व सामाजिक संरक्षण देण्यासाठी  उपाय योजना केल्या जातील.

.

४.१० कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) अधिनियम २०१३ च्या  प्रभावी अंमलबजावणी करिता सर्व आस्थापनांमध्ये तसेच  जिल्हा स्तरावर गठीत करावयाच्या अंतर्गत समित्या तसेच स्थानिक समित्यांची स्थापना करण्यासाठी व त्या पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील यासाठी भरीव प्रयत्न करण्यात येतील.

४.११ बदलत्या काळानुसार आंतर-राज्य स्थलांतरामुळे तयार झालेली नवनवीन आव्हाने, बदलत्या श्रम बाजारपेठा, वेगाने बदलणारे तंत्रज्ञान यामुळे निर्माण झालेल्या नवीन सामाजिक आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी तसेच महिलांची आर्थिक स्थिती सुदृढ करण्यासाठी शासन स्तरावर विविध विभागांमध्ये आवश्यक समन्वय साधून उचित उपाययोजना करण्यात येतील. उद्योग विभागात असलेल्या असंघटित कामगारांसाठी असलेल्या योजनेच्या धर्तीवर असंघटित महिलसांठी योजना तयार करण्यात यावी.

४.१२ विद्यमान सामाजिक सुरक्षा उपाय योजनांतर्गत महिलांना वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, दिव्यांग निवृत्ती वेतन, विमा लाभ, नुकसानभरपाई आणि इतर रोख साहाय्य यांचा संपूर्ण लाभ मिळवून देण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील .

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-४ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

## ५ लिंग समानता पायाभूत सुविधांचा विकास करणे : परिवहन, गृहनिर्माण व स्वच्छता

### धोरणात्मक उपाय योजना

५.१. अर्थव्यवस्थेत महिला व मुलींचा पूर्ण सहभाग सुलभ करण्यासाठी महिला व मुलींसाठी सुलभ होईल अशी वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा, आरोग्य, पाणी पुरवठा व स्वच्छता (WASH) इ. घटकांचा समावेश असलेल्या शहरी आणि ग्रामीण विकासाच्या नियोजनास प्राधान्य देण्यात येईल, विद्यमान अडचणी दूर केल्या जातील. महिला व मुलींना सर्व सार्वजनिक आणि खाजगी पायाभूत सेवा व सुविधा, मनोरंजनाच्या सुविधा निरंतर मिळत राहतील, तसेच त्यांची सुरक्षितता, सुरक्षा आणि त्यांचे सर्वांगीण हित जपले जाईल. नागरिकांच्या वयानुसार निर्माण होणाऱ्या विविध विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणदृष्ट्या टिकाऊ व पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल. धोरणांच्या लाभार्थ्यांसाठी प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी अनेक अंमलबजावणी करणाऱ्या विभागांचा समावेश असलेली एक खिडकी प्रणाली सरकार सुरू करेल.

५.२ महिला व मुलींसाठी सुरक्षित, स्वच्छ, परवडणारी आणि विश्वासार्ह वाहतुकीची सुविधा कमाल गर्दीच्यावेळी तसेच इतर वेळीही शहरी आणि ग्रामीण भागात निरंतर प्रदान केली जाईल. आवश्यक असेल तेथे अल्प दरात किंवा सवलती देऊ करून विनाव्यत्यय वाहतुकीवर भर दिला जाईल. दिव्यांग व्यक्ती, गरोदर स्त्रिया, स्तन्यदा माता व बालकांबरोबर प्रवास करणाऱ्या महिला आणि इतर असुरक्षित गटातील व्यक्तींच्या सुलभ प्रवासाला प्राधान्य दिले जाईल. तालुका आणि जिल्हा स्तरावर महिला केंद्रित पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेवर सर्वसमावेशक सर्वेक्षण केले जाईल आणि माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय आणि संसाधनांचे वाटप केले जाईल, शौचालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) सारख्या अत्यावश्यक सुविधा सर्व प्रदेशांमध्ये समान रीतीने वितरित केल्या जातील याची खात्री करून. हे प्राधिकरणांना पायाभूत सुविधांमधील उणीव ओळखण्यास, गरज असलेल्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यास आणि त्यानुसार विकास उपक्रमांची आखणी करण्यास सक्षम करेल. शिवाय, हि माहिती प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी, धोरणांच्या प्रभावाचे मूल्यमापन करण्यासाठी आणि वास्तविक गरजांवर आधारित संसाधन वाटपासाठी अमूल्य आहे.

५.३ मुली व महिलांची सुरक्षितता आणि सुरक्षेची सुनिश्चिती करण्यासाठी सुरक्षेची अत्याधुनिक मानके लागू केली जातील आणि सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी उच्च तांत्रिक सुरक्षा प्रणाली अस्तित्वात आणली जाईल. खाजगी वाहन चालकांना दिला जाणारा परवाना हा महिलांप्रती संवेदनशीलता, सुरक्षितता आणि सुरक्षा नियमांच्या अधीन राहून दिला जाईल.

५.४ ग्रामीण आणि शहरी भागातील एकटी महिला, बेघर, स्थलांतरित, कुटुंबप्रमुख महिलांसह सर्व महिलांसाठी सुरक्षित, दर्जेदार आणि परवडणारी घरे व निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समान संधी देण्याची हमी देण्यात येईल. महिलांना घरांची मालकी मिळणे, त्यासाठी सुलभ व कमी व्याज दराचे कर्ज उपलब्ध करुन देणे, कर्ज परतफेडीचे लवचिक पर्याय उपलब्ध होणे, घराच्या संयुक्त मालकीसाठी प्रोत्साहन देणे, तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण / शहर व औद्योगिक विकास महामंडळ / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यासारख्या विविध क्षेत्रांचा विकास करणाऱ्या राज्य / महापालिका गृहनिर्माण योजनांची निर्मिती करणाऱ्या संस्थानी

राबविलेल्या विविध योजनामध्ये या घटकांना प्राधान्याने लाभ दिला जाईल. नागरी व शहरी क्षेत्रातील एकटया राहत असलेल्या महिला व महिला प्रमुख असलेली कुटुंबे यांना घराची मालकी मिळवून देण्यासाठी पाठिंबा देण्यात येईल.

५.५ जिल्हा स्तरावर,तालुका स्तरावर आणि सर्व शहरांमध्ये उच्च दर्जाच्या सेवा, सुरक्षितता आणि सुरक्षा देणाऱ्या नोकरी करणाऱ्या महिलांच्या वसतिगृहांची स्थापना करण्यासाठी तरतूद करण्यात येईल. अशा वसतिगृहांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा पर्याय विचारात घेतला जाईल. उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनी, प्रशिक्षणार्थी आणि उद्योग प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींना देखील सवलतीच्या दरात या वसतिगृहांमध्ये प्रवेश देण्यात येईल. तसेच त्यांना इतर विभागांच्या योजनांतर्गत विनामूल्य वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

५.६. औद्योगिक वसाहती आणि कामाच्या आस्थापनांसह सर्व सार्वजनिक, खाजगी आणि कामाच्या ठिकाणी तसेच महिला व मुलींकरीता राष्ट्रीय महामार्ग व महत्त्वाच्या रस्त्यांवर पुरेशा स्वच्छतागृहांच्या सुविधा पुरवण्यात याव्यात. किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी दरम्यान स्वच्छतेच्या साहाय्यासह शाळांमध्ये पुरेसे पाणी आणि स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध केली जाईल. मासिक पाळीदरम्यान निर्माण होणाऱ्या टाकाऊ कचऱ्याची सुरक्षितरीत्या विल्हेवाट लावण्यासाठी सर्व स्वच्छतागृहांमधे आवश्यक सुविधा पुरविल्या जातील.

५.७. स्वच्छता सुविधा वापरणाऱ्या मुली आणि महिला यांच्या सुरक्षिततेची हमी देण्यासाठी, अशा सर्व ठिकाणी सुरक्षिततेचे कोणतेही उल्लंघन टाळण्यासाठी आणि ते होत असल्यास त्याची नोंद करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली सुसज्ज केल्या जातील.

५.८ राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील शासनाच्या विविध योजनांच्या समन्वयातून घरगुती स्तरावर नळाद्वारे पिण्यायोग्य पाणी पुरवठा (किमान ५५ LPCD) करण्यावर भर दिला जाईल. महिला आणि मुलींसाठी सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याची खात्री केली जाईल, दुष्काळी आणि दुर्गम भागात पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होण्यासाठी विशेष तरतुदी केल्या जातील, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांच्या मार्फत घरगुती स्तरावर नळाचा पाणी पुरवठा करणाऱ्या जोडण्या देण्यामध्ये सुलभता आणण्यात येईल. घरगुती स्तरावर पिण्याचे पाणी, कपडे धुणे वा इतर घरगुती वापरासाठी पाणी मिळविण्याच्या कामात पुरुषांचा सहभाग वाढवून, त्यायोगे महिला व मुली यांच्यावरचा भार कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

५.९. वॉश (WASH, Water, Sanitation and Hygiene)उपक्रमांतर्गत महिलांच्या उद्योजकतेला आणि स्थानिक व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी-सामुदायिक भागीदारीच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केला जाईल.

५.१० घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये महिलांकरिता कामाचे तास, मजुरी, व्यावसायिक सुरक्षितता आणि सुरक्षा याची आखणी करून महिलांची भूमिका निश्चित करण्यात येईल तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी पुरेशा आणि योग्य पायाभूत सुविधा निर्माण करण्याची तरतूद केली जाईल. घनकचरा व्यवस्थापनात कार्यरत महिलांचा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यप्रणालीमध्ये समावेश करून त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी तरतुदी केल्या जातील. पंचायत स्तरावर वॉश व्यवस्थापनाचा समावेश करुन लिंग समभाव समावेशक भूमिका सुधारण्यासाठी आरोग्य स्वच्छता व आहार समितीची (VHNSC) भूमिका बळकट करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

५.११ शेतमजूर, घरेलू कामगार व इतर श्रमिक कामे करणाऱ्या महिला कामगारांना बांधकाम कामगार योजनेप्रमाणे लाभ देण्यात येतील.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-५ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

## ६ .लिंग समभाव संवेदनशील प्रशासन व राजकीय सहभाग

### धोरणात्मक उपाय

६.१ विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या सरकारच्या तिन्ही शाखांमध्ये महिला प्रतिनिधित्व आणि सहभाग मजबूत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल .

६.२ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व संस्था, वैधानिक समित्या, मिशन, आयोग, महामंडळे, सहकारी क्षेत्र आणि राजकीय पक्षांसह सर्व प्रशासन आणि प्रशासकीय संस्थांमध्ये महिलांचा समावेश अनिवार्य करण्यासाठी आवश्यक तरतुदी केल्या जातील.

६.३ लिंग समानता सुधारणा, समर्थन (advocacy) तसेच क्षमता बांधणीद्वारे राजकीय क्षेत्र / निवडणूकीसंबंधीचे राजकारण यातील महिलांचा सहभाग व प्रतिनिधित्व वृद्धिंगत करण्याकरिता पोषक वातावरण तयार केले जाईल .

६.४ महिलांचे इतर गोष्टींबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, निर्णय क्षमता, नागरिकांचे हक्क व ह्क्कदारी यांसारख्या क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग व प्रतिनिधित्वा वाढविण्याकरीता त्यांची क्षमता बांधणी करण्यात येईल. आंतरिक विस्थापित व्यक्ती आणि प्रकल्पबाधित व्यक्ती यांसह सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायांमधून निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे नेतृत्व व निर्णय क्षमता वाढविण्याकडे विशेष लक्ष देण्यात येईल.

६.५ उपेक्षित महिलांचे प्रश्न अग्रक्रमाने मांडण्याकरिता महिला ग्रामसभांचे यथोचित यंत्रणासह बळकटीकरण केले जाईल. महिला ग्रामसभांनी घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीने घ्यावी यासाठी प्रयत्न केले जातील.

६.६ लिंग समानता प्रशासनाला गती देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांसह महिलांच्या सामूहिक संस्था , स्वयं साहाय्यता गट , सहकारी संस्था, फेडरेशन, समुदाय आधारित संस्था आणि बिगर शासकीय संघटना) यांसह समन्वय आणि सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

६.७ प्रशासन आणि लोक प्रशासनामध्ये लिंग समानता समानतेची सुनिश्चिती करताना अनुसूचित जमाती ( ST) अनुसूचित जाती (SC), विशेष असुरक्षित जमाती गट (PVTGs), विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (VJNT) आणि विमुक्त जमाती (DNT) प्रवर्गातील महिलांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-६ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

**७ लिंग समानता  नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामानबदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन**
**धोरणात्मक उपाय**

७.१ शाश्वत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन या संदर्भातील लवचिक धोरणे आणि आपत्ती व्यवस्थापन यांमध्ये महिलांची निर्णय घेण्याची आणि नेतृत्व करण्याची क्षमता वाढविण्यासाठी सुनियोजितपणे प्रयत्न करण्यात येतील. अशा उपक्रमांचे नियोजन,अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी महिलांच्या उपजत ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग केला जाईल.

७.२ महिलांची सुरक्षा, कल्याण, आरोग्य आणि पुनर्वसन या उद्देशाने नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन आणि आपत्ती व्यवस्थापन यांमध्ये सर्वसमावेशक जेन्डर समानता  विशिष्ट धोरण तयार करण्यात येईल व ते राबविण्यात येईल.

७.३ नैसर्गिक संसाधनांची न्याय मालकी, ताबा आणि  त्यांचा प्रभावी उपयोग करण्याकरिता, तसेच उपेक्षित व गरीब प्रवर्गातील महिलांच्या  मालमत्तांचे रक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना केल्या जातील, जेणेकरून त्यांना गरिबी व हवामान बदलांच्या गंभीर परिणामांचा सामना करता येईल.

७.४  संवेदनक्षम परिसंस्था ( ecosystem) आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनावर आधारित शाश्वत उपजीविकेचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक समुदायातील महिलांच्या भूमिकेला मान्यता दिली  जाईल. तसेच वन हक्क कायद्यांन्वये  महिलांच्या हक्कांना एक  व्यक्ती आणि समुदाय म्हणून  मान्यता देण्यासाठी आणि वन प्रशासनातील त्यांची भूमिका मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

७.५ पीक निवड, रसायने आणि कीटकनाशकांचा वापर इत्यादींचे महिलांच्या  आरोग्यावर व त्यांच्या सभोवतालच्या वातावरणावर होणारे प्रतिकूल परिणाम ओळखून हवामान बदल अनुकूल शेती पद्धतीला प्रोत्साहन देऊन त्यांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील.

७.६ अपारंपरिक ऊर्जेच्या वापरामध्ये महिलांची महत्त्वाची भूमिका असून या ऊर्जा प्रकारांचा उपयोग त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच त्यांच्या शाश्वत विकासासाठी केला जाईल. ऊर्जा क्षेत्रात महिलांच्या  उद्योजकतेला आणि रोजगाराला चालना देण्यासाठी विशेष लक्ष दिले जाईल.

७.७ लिंग समभावआधारित समस्यांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत अत्यंत समन्वयाने समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापनाची तयारी व नियोजन सुलभरीतीने  केले जाईल. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या तरतुदींच्या अनुषंगाने, मुख्य प्रशासकीय विभाग आणि विविध हितसंबंधी यांचा समावेश असलेल्या, आपत्ती प्रवण क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, स्थानिक आणि राज्य पातळीवर महिलांप्रती निर्माण होणाऱ्या समस्या व  आपत्ती जोखीम कमी करण्याच्या योजना व प्रतिसाद आराखडे तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

७.८ महिलांच्या  सहभागाला आणि नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी, विशेषतः हवामानबदल अनुकूलन करण्यासाठी व प्रभावी आपत्ती प्रतिसाद देऊन जोखीम कमी करण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढविण्यावर भर दिला जाईल.  नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन आणि आपत्ती व्यवस्थापन या सर्व बाबींमध्ये प्रभावीपणे  महिलांप्रती समानता आणण्यासाठी राज्य प्रशासनाच्या सर्व स्तरांवर  क्षमता बांधणीसाठी प्रयत्न केले जातील.

७.९ सदर धोरणात मोठ्या पायाभूत सुविधा, औद्योगिक आणि विकास प्रकल्प यांकरिता  पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) आणि सामाजिक प्रभाव मूल्यांकन (SIA) गटांच्या स्थापनेत महिलांच्या  न्याय्य आणि प्रमाणित प्रतिनिधित्वासाठी तरतूद करण्यात येईल.

७.१० औद्योगिक दुर्घटना, नैसर्गिक आपत्ती, अशांतता, जातीय हिंसाचार आणि सामाजिक अशांततेच्या  इतर घटना यासारख्या संघर्षमय परिस्थितीने बाधित  महिला व मुलींसाठी  तात्काळ प्रतिसाद तसेच दीर्घकालीन पुनर्वसन यांकरिता मुख्य  हितसंबंधितांशी समन्वय साधून एकत्रितरीत्या प्रयत्न केले जातील.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट- ७ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

## ८. इतर महत्त्वाची क्षेत्रे

### धोरणात्मक उपाययोजना

८.१ या धोरणानुसार प्रमाणित, अनुभवी, नामांकित, संस्थाकडून शासकीय, खाजगी व इतर संस्थांमध्ये लिंग समानता विषयी प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करणे बंधणकारक राहील.

८.२ सदर धोरणाच्या अनुषंगाने सर्व माध्यमांव्दारे मुली व महिलांचे संवेदनशील आणि भेदभावरहित चित्रण करणे तसेच महिलांप्रती संवेदनशील भाषेचा वापर करणे अनिवार्य असेल त्यासाठी प्रयत्न केले जातील आणि माध्यम, आस्थापना, उपयुक्त नियमावली / शिष्टाचार (protocol) विकसित करण्यात येईल. महिलांप्रती संवेदनशीलतेच्या नियमांचे तसेच कार्यतंत्रांचे माध्यमांकडून पालन होत आहे अथवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी सक्षम संस्था/ प्राधिकरणाव्दारे वेळोवेळी मूल्यमापन केले जाईल.

८.३ ग्रामीण आणि शहरी भागातील महिला खेळाडूंना आणि महिला क्रीडापटूंना क्रीडा उपकरणे, प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सेवा, आरोग्य आणि पोषण, आर्थिक साहाय्य, स्पर्धा सहभाग, पुरस्कार व सन्मान देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

८.४ शासनाची विविध धोरणे,योजना, उपक्रम, कार्यक्रम यासाठी लिंग समभाव, वय आणि अन्य महत्त्वाच्या निर्देशकांच्या आधारे एकत्रित केलेली माहिती, सुनियोजितरीत्या प्रसारित आणि विश्लेषित करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न केले जातील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, आकडेवारी संग्रहण अधिनियम २००८ आणि तत्सम अधिनियमांच्या अनुषंगाने अशी माहिती राज्य, जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावर सर्व विभागांमध्ये उपलब्ध करण्यात येईल. आर्थिक पाहणी आणि मानव विकास अहवालासारख्या सर्व राज्य विकास अहवालांमध्ये लिंग समभावसमानता आणि महिला सक्षमीकरणाचे एक विशेष प्रकरण समाविष्ट करणे अनिवार्य करण्यात येईल.

८.५ महिला व मुलींचे आरोग्य, शिक्षण आणि वैयक्तिक काळजीशी संबंधित अत्यावश्यक उत्पादने आणि सेवांवरील वस्तू आणि सेवा कर (GST) माफ/कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच महिलांना मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात यावी. शासनाकडून आकारण्यात येणाऱ्या विविध करांमध्ये महिलांना उचित सवलत देण्यात यावी.

८.६ औद्योगिक व सेवा क्षेत्रातील आस्थापनांना त्यांच्या कडून सामूहिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) अंतर्गत उपयोगात आणला जाणारा निधी महिलांप्रती संवेदनशीलता आणि समानता तसेच महिला सबलीकरणाच्या उपक्रमांसाठी देण्या बाबत त्यांना प्रोत्साहित केले जाईल.

८.७ महिलांचे मालमत्ताविषयक हक्क, वारसा हक्क आणि जमिनीचे मालकी हक्क अबाधित राहण्यासाठी अस्तित्वात असलेले विविध कायदे,घटनात्मक तरतुदी, प्रभावीपणे अंमलात  आणल्या जातील यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. सर्व मंत्रालयीन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये पात्र महिलांना प्राधान्य देण्यात येईल. महिलांचे मालमत्ताविषयक हक्क, वारसा हक्क आणि जमिनीचे मालकी हक्क इत्यादींना प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात्मक स्तरावर तरतूद करण्याचाही सरकार विचार करेल.

८.८ पितृसत्ताक सामाजिक रचना व प्रथा आणि परिणामी महिला, मुलींविरुद्ध  होणाऱ्या सर्वव्यापी भेदभावाचे उच्चाटन करण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातील. हिंसक पुरुषत्वाला आळा घालण्यावर विशेष भर देऊन कुटुंब,काम, शिक्षण, करमणूक, नातेसंबंध, विवाह, संमती, संवाद, हिंसा समाप्त करणे, तंत्रज्ञान आणि समाज माध्यमांचा वापर इ. विषयांवर मुलांचे व पुरुषांचे प्रबोधन केले जाईल. बाळ जन्माला आल्यापासून मुलाचे अथवा मुलीचे शाळेत नाव दाखल करताना -नाव , आईचे नाव, वडिलांचे नाव, आडनाव असे लिहिले जाईल.

८.९ महानगरपालिकेच्या प्रत्येक वॉर्डमध्ये एक महिला तक्रार निवारण अधिकारी यांची नियुक्ती केली जाईल, याद्वारे  महिलांना भेडसावणाऱ्या  अडचणींचे निराकरण करण्यात येईल .

८.१० महिला स्नेही हॉटेल , उपहारगृहांची निर्मिती केली जाईल याद्वारे पर्यटनाला चालना मिळेल व महिलांना मोकळेपणाने एकत्र येता येईल/ पर्यटनाचा आनंद घेता येईल.

८.११ प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी महिला महोत्सव, महिला क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल. महिलांच्या, मुलींच्या क्रीडागुणांना , कलागुणांना वाव देण्यासाठी अशा महोत्सवांचे आयोजन महत्त्वाचे ठरेल. यातूनच महिलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल.

८.१२ राज्यातील  प्रत्येक बँक ही महिला स्नेही  बनविण्यात येईल. बँकिंग व्यवहारामध्ये महिलांनी पुढाकार घ्यावा म्हणून लिंग समान  बँक ही संकल्पना अमलात आणली जाईल. महिलांसाठी विशेष खिडकी, बँकेमध्ये अंतर्गत सोयीसुविधांमध्ये महिलांच्या दृष्टीने बदल घडवून आणले जातील व यातून महिलांमधील आर्थिक साक्षरतेचे प्रमाण वाढेल.

८.१३ तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी महिला बचत गटांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी विक्री केंद्र/ विपणन केंद्र  उभारण्यात येईल. बऱ्याचदा बचत गटामार्फत वस्तूंचे उत्पादन तर होते परंतु मुख्य प्रश्न असतो तो त्याचे विपणन / विक्री करण्याचा. यासाठीच  तालुका व जिल्हा पातळीवर खास बचत गटांसाठी विक्री /विपणन केंद्र उभारले जाईल यासाठी स्थानिक स्वराज संस्था पुढाकार घेतील.

८.१४ शाळेच्या अभ्यासक्रमात / शालेय जीवनात मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातील.मुलींची छेडछाड, अत्याचाराचे वाढते प्रमाण बघता लहान वयापासूनच त्यांना स्वसंरक्षणाचे धडे देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शालेय जीवनापासूनच मुलींना ज्युडो/कराटे या सारखे स्वसंरक्षणाचे धडे दिले जातील.यासाठी शालेय शिक्षण विभाग आवश्यक उपाययोजना करील.

८.१५ महिलांसाठी विशेष मदत क्रमांक (Help Line) सुरु करण्यात येईल. महिलांना त्वरित मदत उपलब्ध होण्यासाठी  २४ तास कार्यान्वित असणारे विशेष मदत क्रमांक सुरु करण्यात येतील.

८.१६ मिशन वात्सल्य अंतर्गत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार कोरोना मुळे विधवा झालेल्या महिलांचे संपत्तीविषयक, वारसांचे हक्क यांचे जतन करण्यात येईल.संपत्ती विषयक वाद उद्भवू नयेत, त्यांची आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती व जिल्हा विधि सेवा प्राधिकरण हे आवश्यक उपाययोजना करतील.

८.१७ शुभमंगल सामूहिक विवाह योजनेअंतर्गत प्रति जोडपे महिलेच्या नावे देण्यात येणाऱ्या रु.१०,०००/- हया रक्कमेत उचित वाढ करण्याचा विचार केला जाईल.

८.१८ रेशन दुकानावर सॅनिटरी नॅपकिन्स महिलांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येतील.

८.१९ व्यावसायिक वाहने महिलांच्या नावावर नोंदणी केल्यास व त्या वाहनाचा वापर चालक म्हणून महिलाच करणार असल्यास वाहनाची नोंदणी करताना लागणाऱ्या शुल्कात सूट देण्याचा विचार केला जाईल.

८.२० व्यावसायिक वाहनांच्या महिला चालकांचा विमा काढताना  सवलत देण्याचा विचार केला जाईल.

८.२१ दिनांक ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी प्रत्येक ग्रामपंचायत, ग्रामसभेचे आयोजन करून २ आदर्श महिलांचा सत्कार करील.

८.२२ पूर्णतः महिलांचे व्यवस्थापन असलेल्या हॉटेलला स्थानिक करात सूट देण्याचा विचार केला जाईल.

८.२३ महिलांना व्यावसायिक करात राज्यशासनाकडून आकारल्या जाणाऱ्या करात सुट देण्याचा विचार केला जाईल.

८.२४ गावातील प्रत्येक लग्नाची नोंद सक्तीची करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास, मुला-मुलीच्या वयाचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

८.२५. गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त आहे. त्यावर लस उपलब्ध आहे. बाजारात या लसीची किंमत ३ हजारापेक्षा जास्त आहे. सर्वसामान्य महिलांना ही लस घेणे परवडत नाही. त्यामुळे ही लस शासकीय स्तरावर मोफत उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणात या कर्करोगाने महिलांचा होणारा मृत्यू दर रोखणे शक्य होईल.

८.२६ आई-वडिलांच्या पालनपोषणाची समान जबाबदारी मुलगा आणि मुलगी यांच्याकडे दिल्यास मालमत्तेवर समान अधिकार देण्यासाठी कोणाचाही विरोध असणार नाही.

८.२७ संजय गांधी निराधार योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्यात येईल, तसेच लाभाची रक्कम वाढविण्यात येईल.

८.२८ बालनिधीच्या धर्तीवर महिला विकास निधी केंद्र व राज्य शासनाच्या नियमावलीस अनुसरुन, सामुहिक सामाजिक उत्तरदायित्वाच्या (CSR) माध्यमातून निधी मिळविण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष महिला व बाल विकास विभागा अंतर्गत उघडण्यात येईल.

**धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा परिशिष्ट-८ मध्ये विस्तृतपणे दर्शविलेला आहे.**

**चार. संस्थात्मक यंत्रणा :**

१. महिला व मुली यांच्या सबलीकरणास चालना देण्यासाठी राज्यात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संस्थात्मक यंत्रणांचे बळकटीकरण केले जाईल. त्यासाठी या यंत्रणांना पुरेसे प्रशासकीय, मनुष्यबळ, आर्थिक साहाय्य दिले जाईल. त्यासाठी यंत्रणांना प्रशिक्षण व कौशल्य देणे, गरजेनुसार कामकाजासाठी मानक कार्यप्रणाली (SOP) तयार करणे, इ. प्रकारचे साहाय्य केले जाईल.

२. मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिलांप्रती समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीची (HPC) स्थापना केली जाईल.

   अ. राज्याच्या मा. महिला आणि बाल विकास मंत्री तसेच इतर प्रमुख शासकीय विभागांचे मंत्री आणि संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी हे त्या उच्चाधिकार समितीचे सदस्य असतील.

   ब. महिलांप्रती समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी गठीत करण्यात आलेली उच्चाधिकार समिती धोरणात्मक पर्यवेक्षण आणि मार्गदर्शन करेल.

   क. उच्चाधिकार समितीच्या आवश्यकतेनुसार बैठकी बोलविण्यात येतील.

३. मा. महिला व बाल विकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या अंतर्गत एक राज्यस्तरीय विशेष कार्य गटाची स्थापना केली जाईल. मुख्य सचिवांसह विभागीय आयुक्त, संबंधित विभागांचे सचिव व आयुक्त आणि संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी हे सदर विशेष कार्य गटाचे सदस्य असतील.

   अ. संबंधित / संलग्न विभाग / मंत्रालये, राज्य महिला आयोग, समाज कल्याण मंडळे यांचे प्रतिनिधी विशेष कार्य गटाचे सदस्य असतील. अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, महिला संस्था, उद्योग क्षेत्र, कामगार संघटना, वित्तपुरवठा संस्था, शैक्षणिक /अग्रणी शैक्षणिक संस्था, तज्ज्ञ, मान्यवर कलाकार, माध्यम व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला समूहातील तळागाळातील नेते यांना विशेष कार्य गटाचे सदस्य म्हणून आमंत्रित केले जाईल.

   ब. विशेष कार्य गटाची आवश्यकतेनुसार बैठक बोलविण्यात येईल.

   क. विशेष कार्य गट महिला धोरणाबाबतच्या राज्यस्तरीय अभिसरण कृती आराखड्याची आखणी करणे, राज्यापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत सर्व स्तरांवर अंमलबजावणीला पाठबळ देणे, कृती आराखड्याचे सतत संनियंत्रण व मूल्यमापन करणे, आवश्यक तेथे सुधारात्मक कार्यवाही करणे आणि धोरणात सुधारणा करण्यासाठी आणि राज्यात महिलांप्रती समानता व महिला सक्षमीकरणासाठी तयार केलेल्या कृती आराखड्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी उच्चाधिकार समितीला शिफारशी करणे इत्यादी कार्ये करील. विशेष कार्य गटामार्फत सर्वसमावेशक ऑनलाइन देखरेख ठेवणे, मूल्यमापन करणे व निश्चित केलेल्या ध्येयपूर्तीसाठी विविध घटकांकडून येणाऱ्या सूचना संकलित केल्या जातील.

४. धोरणात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख आणि मार्गदर्शन करण्यासाठी एक जिल्हास्तरीय अंमलबजावणी आणि सुकाणू समिती (DISC) स्थापन केली जाईल.

अ. पालकमंत्री हे सदर समितीचे अध्यक्ष / प्रमुख असतील. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला दक्षता समितीचे जिल्हा प्रमुख , विभाग प्रमुख, सहयोगी विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक ,महिला आर्थिक महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आणि अन्य अधिकारी यांच्यासह जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी हे त्या समितीचे सदस्य असतील.

आ. जिल्हास्तरीय समितीची बैठक त्रैमासिक तत्त्वावर घेण्यात येईल आणि अतिरिक्त/ निकडीच्या बैठकी आवश्यकता असेल तेव्हा घेता येतील.

५. लिंग समभावसमानता आणि महिला सक्षमीकरणासाठी लिंग समानता संसाधन केंद्राची स्थापना केली जाईल. त्याद्वारे माहितीचे संकलन आणि प्रसार, संशोधन कार्य हाती घेणे, सर्वेक्षण करणे, प्रशिक्षण व जागृती निर्माण कार्यक्रम राबवणे इ. कार्ये केली जातील. सदर लिंग समभाव संसाधन केंद्र हे राज्यातील विविध महिला अभ्यास केंद्र, इतर संशोधन आणि शैक्षणिक संस्था यांच्याशी सहयोग करतील व त्यासाठी संपर्काच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साधनांद्वारे संपर्क साधतील.

६. जिल्हा स्तरावरील गठीत संस्थांचे बळकटीकरण करण्यासह , तळागाळातील महिला स्वयं साहाय्यता समूह/ समूह गट आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सुद्धा त्यांचे संबंधित विभाग / मंत्रालये आणि राज्य संसाधन केंद्र हे आवश्यकतेनुसार योग्य मार्गदर्शन करतील व त्यांच्यासाठी क्षमता बांधणी कार्यक्रमांचे आयोजन करतील.

७. महिलांप्रती समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका स्तरावरील महिला बचतगट आणि त्यांच्या महासंघांशी सहयोग करण्यात येईल. तसेच त्यासाठी तळागाळातील विविध यंत्रणांचे एक मजबूत जाळे निर्माण करण्यात येईल.

८.राज्यात लिंग समभाव समानता आणि महिला सक्षमीकरणास गती देण्यासाठी सर्व सामाजिक आणि आर्थिक विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे सुसूत्रीकरण सुलभ केले जाईल. आंतरराष्ट्रीय संस्था, धर्मादाय संस्था आणि औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांचे सामूहिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) याव्दारे आणि अन्य शासकीय व अशासकीय यंत्रणाद्वारे आवश्यक तेथे अतिरिक्त साधनसंपत्ती उभी करण्यात येईल.

## पाच.   साधनसंपत्तीचे व्यवस्थापन

संबंधित विभाग, धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक साधनसंपतीची आणि मानवी संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करून त्याचे वाटप करतील. वित्तीय पतसंस्था आणि बँका, खाजगी क्षेत्र, नागरी समाज, धर्मादाय संस्था आणि औद्योगिक कंपन्याचे सामूहिक सामाजिक उत्तरदायित्व यांद्वारे आणि इतर संबंधित संस्थांद्वारे अतिरिक्त आर्थिक साधनसंपत्ती उभी केली जाईल. आवश्यक त्या आंतरविभागीय समन्वय आणि अभिसरणाद्वारे सध्याच्या लिंग समभाव प्रतिसादी अर्थसंकल्पाच्या आखलेल्या योजनेची ("रोडमॅप ऑन जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेटिंग") अंमलबजावणी आवश्यक त्या आंतरविभागीय समन्वय आणि सुसूत्रता यांद्वारे बळकट केली जाईल आणि महाराष्ट्रातील लिंग समभाव समानता व महिला सक्षमीकरणासाठीच्या एकूण संसाधन वाटप आणि व्यवस्थापनासाठी ती योजना मार्गदर्शक म्हणून वापरली जाईल.

**साधनसंपत्तीचे वाटप आणि व्यवस्थापन यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :**

- लिंग समभाव आधारित लाभार्थींची माहिती एकत्रित करणे आणि संबंधित अर्थसंकल्प तरतुदीचे अहवाल यांचे सुधारित संकलन आणि वित्त विभागाद्वारे प्रकाशित वार्षिक जेंडर बजेट स्टेटमेंट (GBS) यांच्या लेखापरीक्षणाद्वारे राज्यात लिंग समभाव आधारित अर्थसंकल्पाच्या अभ्यासास बळकटी आणणे.
- सर्व स्तरांवर लिंग समानता प्रतिसादात्मक नियोजन आणि अर्थसंकल्पनासाठी वित्त, नियोजन, सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण विकास, पंचायती राज, शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, महिला व बाल विकास, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, नगर विकास विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विकास आणि आदिवासी विकास विभाग इ. या प्रमुख विभाग/मंत्रालयांमधील आंतरविभागीय समन्वयासाठी योजना आणि यंत्रणा विकसित करणे.
- लिंग समभाव आधारित अर्थसंकल्प प्रणालीत नोंदवल्याप्रमाणे मुली, महिला यांच्याशी संबंधित कार्यक्रमांसाठी केलेल्या संसाधनांच्या वाटपाच्या लाभांचे मूल्यांकन करण्यासाठी सदर योजनांच्या अंतर्गत त्यांना अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी धोरणांमध्ये योग्य ते बदल केले जातील.
- सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात AI टूल चा वापर करण्यात येईल (संसाधनाचे वाटप,माहिती संकलन, सुरक्षा, नियोजन, देखरेख इत्यादी साठी)
- संबंधित विभागांद्वारे धोरण आणि कृती आराखड्याचा प्रचार-प्रसार आणि अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी संसाधने विकसित केली जातील.
- महिला व बालविकास विभागाच्या समन्वयातून बँक आणि वित्तीय पत संस्थांमार्फत योग्य धोरणात्मक उपक्रमांद्वारे आणि नवीन संस्थांच्या विकासाद्वारे कर्जाच्या गरजा पूर्ण करणे.
- संबंधित सर्व क्षेत्रांनी महिला आणि मुलींच्या गरजा आणि हितांना प्राधान्य देऊन त्या पूर्ण करण्यासाठी सर्व मंत्रालये आणि विभागांकडून महिलांना योग्य प्रमाणात निधी दिला जाईल याची दक्षता घेण्यात येईल.

परिशिष्ट १

धोरणात्मक अंमलबजावणी योजना – आरोग्य, पोषण व स्वास्थ्य

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| धोरणाचे निकष १.१, १.२,१.३,१.४,१.९,१.१२ | | | | | | |
| १. | प्रसूतीपूर्व आणि बाल आरोग्य सेवा. | प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप आरोग्य केंद्रे यांच्या मार्फत गर्भवती आणि स्तन्यदा महिलांना मोफत स्वास्थ्य तपासणी, औषधे आणि शुश्रूषा इ. पुरेशी आरोग्य सेवा देणे. पिवळे व केशरी शिधापत्रिका धारक (एक लाख उत्पन्न गट) महिलांवर शासकीय रुग्णालयात मोफत उपचार करणे | अल्प कालावधी | • पहिल्या तिमाहीत नोंदणी करणाऱ्या गर्भवती महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली टक्केवारी<br>• प्रसूतीपूर्व पूर्ण काळजी प्राप्त करणाऱ्या गर्भवती महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली टक्केवारी<br>• एकात्मिक बाल विकास योजनेसाठी नोंदणी केलेल्या गर्भवती आणि स्तन्यदा महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या<br>• पिवळे व केशरी शिधापत्रिका धारक लाभार्थी महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली टक्केवारी | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दुर्लक्षित, दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण अशा शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेणे. | अल्प कालावधी | • ग्रामपंचायत/ नगरपालिका / तालुका/ प्रभाग/जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरांची स्थळनिहाय संख्या<br>• लाभ घेतलेल्या महिलांची स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | आदिवासी विकास विभाग, ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, महिला व बाल विकास विभाग |
| | | महिलांसाठी प्रसूती पूर्व घ्यावयाच्या काळजीसाठी आवश्यक त्या पुरेश्या सोयीसुविधा सर्व स्तरावरील आरोग्य केंद्रांमध्ये उभारणे. | मध्यम कालावधी | • मानक कार्यप्रणाली विकसित करणे आणि प्रसारित करणे. कार्यचालन पद्धती (SOP) विकसित केली<br>• सनियंत्रण यंत्रणा विकसित केली | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | सामाजिक आणि वर्तणूक बदल अभियानाद्वारा (SBCC) स्तनपानाविषयी १००० दिवसांची मोहीम अंगणवाड्यांमार्फत, आरोग्य केंद्रांमार्फत व इतर | अल्प कालावधी | • सुरू केलेल्या मोहिमेची स्थळनिहाय संख्या<br>• पोहचू शकलेल्या महिलांची स्थळ व सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या | महिला व बाल विकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | सार्वजनिक आरोग्य विभाग (IEC Bureau), |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रसारमाध्यमांद्वारे सामाजातील सर्व स्तरांमध्ये राबविणे. | | | | |
| २. | प्रसूती पूर्व लिंग निदान करण्याच्या प्रथेचे उच्चाटन करणे | आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि यंत्रणांचे गर्भधारणा -पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम २००३ ( PCPNDT Act २००३) संबंधित प्रशिक्षण व जाणीवजागृती यानुसार कार्यक्रम आयोजित करणे. | अल्प कालावधी | • प्रशिक्षण कार्यक्रमांची स्थळ, कालावधी आणि संस्थानिहाय संख्या<br>• प्रशिक्षित झालेल्या वैद्यकीय आणि वैद्याकीय क्षेत्राशी संलग्न असलेले कर्मचारी यांची (Paramedical Staff) लिंग समभाव, स्थळ, संस्था, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | गृह विभाग (पोलीस), महिला व बाल विकास विभाग |
| | | सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य सुविधांमध्ये गर्भधारणा - पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम २००३ अन्वये घालून दिलेल्या प्रक्रियांचे पालन करण्याचे नियमित आणि योजनाबद्ध रीतीने सनियंत्रण करणे. | अल्प कालावधी | • गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र लिंग निवड प्रतिबंध कायद्यांतर्गत लेखापरीक्षण/निरीक्षण अहवाल<br>• लिंग निदान प्रथेच्या प्रकरणांची स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | गृह विभाग (पोलीस), महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लिंग गुणोत्तर प्रमाण (१००० पुरुषांमागे महिलांची संख्या जास्त असलेल्या) जास्त असलेल्या गावांना / ग्राम पंचायतींना /नगरपालिकांना/ प्रभागांना प्रोत्साहन आणि पुरस्कार देणे. | मध्यम कालावधी | • गाव / ग्रामपंचायती / नगरपालिका/ प्रभाग निहाय सुधारित लिंग गुणोत्तर टक्केवारीची स्थिती.<br>• पुरस्कारांची संख्या | महिला व बाल विकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | विशेषत: लिंग निवडीचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या जिल्ह्यांमध्ये मुलींच्या संगोपनासाठी व लोक सहभागासाठी सामाजिक आणि वर्तणूक बदल इ. माहिती देणारी (SBCC) मोहीम राबविणे. | अल्प कालावधी | • सामाजिक आणि वर्तणूक बदल जनसंपर्क मोहिमांची संख्या<br>• समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायत, नगरपालिका, प्रभागांची, जिल्ह्यांची संख्या. | महिला व बाल विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| ३. | संस्थात्मक प्रसूती आरोग्य केंद्रे इ. ठिकाणी), संदर्भ सेवा, | प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, व जननी सुरक्षा योजना यासारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी | अल्प कालावधी | • गाव निहाय/ ग्रामपंचायती निहाय/ शहरी भागात प्रभाग निहाय प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या अंतर्गत लागू असलेल्या विशेष लाभार्थ्यांची संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, | महिला व बाल विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | वाहतूक व्यवस्था आणि आपत्कालीन प्रसूती सेवा | | | • गाव निहाय/ ग्रामपंचायती निहाय/ शहरी भागात प्रभाग निहाय जननी सुरक्षा योजनेच्या अंतर्गत लागू असलेल्या विशेष लाभार्थ्यांची संख्या.<br>• गाव निहाय/ ग्रामपंचायती निहाय/ शहरी भागात प्रभाग निहाय माझी कन्या भाग्यश्री योजनेच्या अंतर्गत लागू असलेल्या विशेष लाभार्थ्यांची संख्या. | स्थानिक स्वराज्य संस्था | विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आरोग्य उप-केंद्रांपासून ते वैद्यकीय महाविद्यालयांपर्यन्त सर्व ठिकाणी पुरेसे मनुष्य बळ आणि पायाभूत सुविधा, संवेदनशील वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी उपलब्ध असल्याची खात्री करून दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणे. | अल्प कालावधी | • पायाभूत आरोग्य सेवेच्या नियमित लेखा परीक्षणाचे अहवाल.<br>• आरोग्य सेवा केंद्रांवर प्रसूती होणाऱ्या महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली टक्केवारी<br>• कार्यरत असलेल्या अंत:पोषण (Incubation) सुविधा स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या.<br>• कार्यरत असलेल्या संदर्भ सेवांची स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या.<br>• नियमित मनुष्य संसाधन अनुपालन अहवाल<br>• महिलाप्रती संवेदनशीलता वृद्धिंगत करणाऱ्या प्रशिक्षणांची स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सुलभतेने सुसज्ज रूग्णवाहिका मिळेल यासाठी योग्य रीतीने व्यापक जाहिरात करणे. | अल्प कालावधी | • प्रत्येक आरोग्य केंद्रावर उपलब्ध रुग्णवाहिकांची स्थळनिहाय संख्या .<br>• आपत्कालीन स्थितीत प्रसूती सेवा मिळणेसाठी आलेल्या दूरध्वनी कॉल्सची स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचनालय |
| | | प्रत्येक शासकीय आरोग्य केंद्राच्या ठिकाणी पर्याप्त संख्येत स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध करून देणे. | अल्प कालावधी | • प्रत्येक आरोग्य केंद्रावरील स्त्रीरोगतज्ज्ञांची स्थळनिहाय संख्या .<br>• जिल्हा/ तालुका / गावातील / प्रभागातील आरोग्य केंद्रावर स्त्रीरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटीची स्थळ निहायसंख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | गर्भधारणा आणि प्रसूतीपश्चात नैराश्य या समस्येसाठी प्रसूती दरम्यानच्या कालावधीतील उपचारादरम्यान उपाययोजना करणे. मानसोपचारतज्ज्ञ सेवा उपलब्ध करणे तसेच गरोदर महिला व तिच्या कुटुंबासाठी | दीर्घ कालावधी | • नेमणूक करणायत आलेल्या मानसोपचारतज्ञांची स्थळनिहाय संख्या<br>• सुरु करण्यात आलेल्या समुपदेशन केंद्रांची संख्या<br>• लाभ घेतल्या महिला व पुरुषांची स्थळ निहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विशेष समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे. | | | | |
| ४. | संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांसाठी लसीकरण करणे | लसीकरण कार्यक्रमाला गती मिळण्याकरिता नियमित शिबिरे घेणे. | अल्प कालावधी | • प्रत्येक तालुक्यात/गावात/प्रभागामध्ये (शहरी/आदिवासी/ग्रामीण) घेतलेल्या लसीकरण शिबिरांची स्थळनिहाय संख्या . | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | महिला आणि मुलांच्या लसीकरणाचा डेटा/ माहिती संकलित करण्यासाठी भ्रमणध्वनी उपयोजकाचा ( Mobile aap) उपयोग करणे. | अल्प कालावधी | • पूर्णपणे लसीकरण झालेल्या मुलींची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या.<br>• पूर्णपणे लसीकरण झालेल्या गर्भवती महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, ग्राम विकास विभाग,नगर विकास विभाग, |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आदिवासी विकास विभाग |
| | | लसीकरणाबाबत जाणीव जागृती होणेसाठी माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) उपक्रम राबविणे. | अल्प कालावधी | • राबविण्यात आलेल्या/ सुरू असलेल्या माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) उपक्रमांची स्थळनिहाय संख्या .<br>• माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) उपक्रम किती व्यक्तिंपर्यंत पोहचले त्याची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय , ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| ५. | मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन (MHM) | समाजातील सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये/ आरोग्य केंद्रांमध्ये पुरेश्या स्वच्छतागृहांची संख्या असावी. त्यात पुरेसा एकांत, स्वच्छता, दर्जेदार बांधकाम, पुरेशी प्रकाश व्यवस्था, वाहते व स्वच्छ पाणी, साबण, स्वयंचलित | अल्प कालावधी | • शिक्षण हक्क अधिनियामांन्वये (RTE) सुसंगत दर्जेदार स्वच्छतागृहांची सुविधा देणाऱ्या शाळांची स्थळनिहाय संख्या .<br>• सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेच्या पायाभूत सोयी सुविधांच्या केलेल्या लेखा परीक्षणाची स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बाल विकास |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सॅनिटरी पॅड यंत्र आणि सुयोग्य निचरा यांची उपलब्धता करून देण्यात यावी. | | • दर्जेदार स्वच्छता सुविधा उपलब्ध असणाऱ्या सार्वजनिक संस्था/ कार्यालयांची स्थळनिहाय संख्या .<br>• दर्जेदार स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या सार्वजनिक ठिकाणांची स्थळनिहाय संख्या | | विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, वित्त व नियोजन विभाग |
| | | कूर्मा घरांमध्ये व त्यासारख्या व्यवस्थांमध्ये स्वच्छ व पुरेश्या पाण्याची उपलब्धता असणाऱ्या स्वच्छता गृहांची निर्मिती केली जाईल. | अल्प कालावधी | • स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध असणाऱ्या कूर्मा घरांची व त्यासारख्या व्यवस्थांची संख्या. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महिला व बाल विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शालेय पाठ्यक्रमात मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापनासह उचित लैंगिक शिक्षणाचा समावेश करण्यात येईल. | अल्प कालावधी | • शाळांध्ये सुरू असणाऱ्या लैंगिक शिक्षणाच्या उपक्रमांची स्थळनिहाय संख्या.<br>• सहा आठवड्यांचे मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन उपक्रम अंमलबजावणी करणाऱ्या शाळांची स्थळनिहाय संख्या. | शालेय शिक्षण विभाग, | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग |
| | | राज्यभरात योग्य मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन सुरळीत होण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय प्रचार प्रसिद्धी करण्यात येईल. | अल्प कालावधी | • जिल्हा / नगर / तालुका / प्रभाग स्तरावरील प्रचार प्रसिद्धीची स्थळनिहाय संख्या.<br>• प्रचार प्रसिद्धी अभियान किती लोकांपर्यंत पोहचले त्यांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, अल्पसंख्याक विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापनावर आशा, अंगणवाडी कर्मचारी व शिक्षिक यांचे नियमित प्रशिक्षण आयोजित करणे. | अल्प कालावधी | • मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन, जाणीवजागृती आणि स्वच्छता यांच्या आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या.<br>• प्रशिक्षित झालेल्या आशा, अंगणवाडी सेविका आणि शिक्षक यांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | |
| धोरणाचे निकष ,१.३,१.४,१.५ १.९ | | | | | | |
| ६. | महिलाप्रती संवेदनशील आरोग्य सेवा आणि कुटुंब नियोजन | महिला व मुलींना सहजतेने आरोग्य सेवा सुविधा मिळण्यासाठी आरोग्य उप केंद्रांपासून ते वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत आरोग्य सेवांचे बळकटीकरण करणे. | मध्यम कालावधी | • कुटुंब नियोजनाच्या सेवा उपलब्ध करून देणाऱ्या आरोग्य सुविधांची स्थळनिहाय संख्या<br>• कुटुंब नियोजनाची सुविधा/साधने वापरणाऱ्या महिलांची स्थळनिहाय टक्केवारी. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय , नगर विकास विभाग, अल्पसंख्याक विभाग, सामाजिक न्याय |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | व विशेष साहाय्य विभाग |
| | | समाजातील सर्व स्तरातील नागरिकांसाठी विवाहपूर्व, गर्भधारणा पूर्व, कुटुंबनियोजना बाबत समुपदेशन उपलब्ध करून देणे. | अल्प कालावधी | • कुटुंबनियोजन समुपदेशनात प्रशिक्षित झालेल्या वैद्यकीय आणि परावैद्यक कर्मचाऱ्यांची (Paramedical Staff) संख्या.<br>• व्याक्तिगतरीत्या समुपदेशन सेवेचा लाभ घेतलेल्यांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग,स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, |
| | | लिंगभावाच्या आधारे भेदभाव न करता राज्यातील सर्व आरोग्य केंद्रांवर गर्भनिरोधक उपलब्ध करून देण्यात येती ल. | अल्प कालावधी | • बसवलेल्या गर्भनिरोधक वेंडिंग यंत्रांपैकी कार्यरत यंत्रांची स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | सुरक्षित व स्वस्त, परवडणाऱ्या गर्भपात/एम टी पी संबंधी यंत्रणांची उभारणी सर्व आरोग्य सुविधांच्या ठिकाणी करणे. | अल्प कालावधी | • सुरक्षित व स्वस्त गर्भपात/ एम टी पी साठी उभारलेल्या आरोग्य यंत्रणांची स्थळ, संस्थानिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • गर्भपात/MTP यंत्रणांचा लाभ घेतलेल्या लाभार्थी महिलांची स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या | | |
| | | समाजात कुटुंब नियोजनाबाबत सामाजिक आणि वर्तणूक बदल अभियानाद्वारा (SBCC) प्रचार प्रसार करणे. | अल्प कालावधी | • राबविण्यात आलेल्या माहिती, शिक्षण, संपर्क (IEC) उपक्रमांची स्थळनिहाय संख्या .<br>• माहिती, शिक्षण, संपर्क (IEC) उपक्रमांद्वारे किती लोकांपर्यंत पोहचण्यात आले त्याची लिंग समभाव, स्थळ आणि सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय |
| | | पुरुष नसबंदी कार्यक्रमांचे अनुदान / प्रोत्साहन वाढवणे. | अल्प कालावधी | • पुरुष नसबंदी / कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या महिलांच्या प्रमाणात स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेले गुणोत्तर प्रमाण.<br>• नसबंदी केलेल्या पुरुषांची स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या . | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मातृत्वासाठी प्रतिस्थापित (सरोगेट माता) व त्यांच्या कुटुंबांना दर्जेदार आरोग्य सेवा आणि समुपदेशन सेवा प्रदान करणे. | मध्यम कालावधी | • मातृत्वासाठी प्रतिस्थापित (सरोगसीसाठी) तपशीलवार नैतिक मार्गदर्शक तत्व आणि सहायक प्रजोत्पादन कार्यक्रम (IVF) पद्धतींचा वापर केला गेला आहे.<br>• संबंधित पद्धतीचा अबलंब करणाऱ्या केंद्रांची सोयी-सुविधा, स्थळनिहाय स्वतंत्रपणे संख्या.<br>• संबंधित सेवेच्या लाभार्थीची सोयी-सुविधा,सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय स्वतंत्रपणे संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, |
| **धोरणात्मक उपाययोजना १.१,१.२,१.३, १.६,१.९, १,१२** | | | | | | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. | संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांच्या तसेच आरोग्याच्या इतर विशिष्ट समस्या | राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय आरोग्य यंत्रणेद्वारे महिलांमधील (PCOS), अंतःस्त्रावी, कर्करोग, मूत्र मार्ग संक्रमण (UTIs), क्षयरोग, रजोनिवृत्तीच्या समस्या इत्यादींसाठी निदानात्मक, उपचरात्मक व संदर्भ सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. | मध्यम कालावधी | • आरोग्य तक्रारींचे निदान झालेल्या आणि औषधोपचार घेतलेल्या महिला रुग्णांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या.<br>• शासकीय संस्थांमध्ये सुधारित संदर्भ सेवांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | सर्व आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये परवडणाऱ्या दरातील HIV साठी उपाययोजना करताना वापरलेली औषधे (Anti Retroviral Treatment – ART) सुविधा उपलब्ध करणे. | अल्प कालावधी | • स्थानानुसार ART सुविधा पुरवणाऱ्या आरोग्य केंद्रांची संस्था, स्थळनिहाय स्वतंत्रपणे संख्या.<br>• ART सुविधेचा लाभ घेतलेल्या रुग्णांची स्थळ, लिंग समभाव, संस्था, सामाजिक प्रवर्ग निहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उपरोक्त आरोग्य विषयक समस्यांसाठी सरकारी आरोग्य यंत्रणांमध्ये तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या वाढविणे. | मध्यम कालावधी | • जिल्हानिहाय सरकारी सुविधांमध्ये असलेल्या तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या.<br>• तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या वाढविलेल्या सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरोग्य केंद्रांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | महिलांच्या शारीरिक आरोग्य विषयक समस्यांचे निदान आणि औषधोपचारावर भर देणारी शिबिरे आयोजित करणे. | अल्प कालावधी | • प्रत्येक जिल्ह्यात / तालुक्यात/ प्रभागात /गावांमध्ये झालेल्या शिबिरांची संख्या.<br>• लाभार्थीची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | राज्य विमा योजनांच्या अंतर्गत महिलांच्या आरोग्य विम्याला चालना देणे. | अल्प कालावधी | • महिला विमा खातेधारकांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या.<br>• विमा सुविधेचा लाभ घेतलेल्या महिला लाभार्थीची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, वित्त व नियोजन विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| धोरणात्मक उपाययोजना १.१,१.२,१.३,१.७,१.९ | | | | | | |
| ८. | महिलांसाठी वृद्धापकाळातील विशेष आरोग्य विषयक समस्या व वेदना शामक उपाययोजना. | राज्यात वयोवृद्ध महिलांची काळजी घेण्यासाठी शासनामार्फत विशेष आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. | मध्यम कालावधी | • वृद्धांच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या संस्थात्मक सेवांची (Institutional Care) स्थळनिहाय संख्या.<br>• वृद्धाश्रमात राहणाऱ्या महिलांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | राज्यातील सर्वच आरोग्य सेवांमध्ये महिलांसाठी उपशामक / दोष परिहारात्मक सेवा (वृद्धापकाळातील विविध व्याधींवरील उपचार सेवा) अंतर्भूत करण्यातयेतील | मध्यम कालावधी | • उपशामक/ दोषपरिहारक सेवा (palliative care) देणाऱ्या संस्थांची स्थळनिहाय संख्या.<br>• उपशामक/ दोषपरिहारक सेवा केंद्रातील रुग्णांची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्यातील सर्वच आरोग्य सेवांमध्ये लिंग विषयक समभाव संवेदनशील उपशामक/ दोषपरिहारात्मक सेवा देणेसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. | मध्यम कालावधी | • वृद्धापकाळ व वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्यांवर उपचार करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या प्रशिक्षण घटकांची (Module) संख्या.<br>• उपशमन प्रशिक्षण घटकांची (Module) संख्या.<br>• वृद्धांच्या आरोग्या संबंधी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या.<br>• उपशमन सेवा संबंधी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या.<br>• प्रशिक्षित झालेल्या कर्मचाऱ्यांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | महिला व मुलींसाठी कर्करोगावर लक्ष केंद्रित करणारे प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, समुपदेशन, शुश्रूषा आणि पुनर्वसनात्मक बाबींचा समावेश | अल्प कालावधी | • अंमलबजावणी झालेल्या कार्यक्रमांची स्थळनिहाय संख्या.<br>• राज्यातील लाभार्थींची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय वेगळी केलेली माहिती. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | असलेले उपक्रम राबविण्यात येतील. | | | | |
| | | महिला व मुलींसाठी कर्करोगावर उपचार आणि काळजी घेण्यासाठी अल्प दरात सेवा देणारी विशेष योजना राबवणे. | अल्प कालावधी | • सुरु केलेल्या योजनांचा शासन निर्णय<br>• राज्यातील लाभार्थ्यांची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | आजारी, कर्करोगी आणि वृद्ध महिला रुग्णांसाठी संदर्भ सेवांमध्ये सुधारणा करणे. | अल्प कालावधी | • प्रत्येक जिल्हा / तालुका/ शहर / प्रभागनिहाय गंभीर आजारी, कर्करोगी आणि वृद्ध महिला रुग्णांची स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे दिलेली माहिती.<br>• संदर्भ सेवेचा लाभ घेतलेल्या महिलांची, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | महिलांच्या उपशामक आणि वृद्धावस्थेतील गरजांबाबत जनजागृती मोहीम राबवणे. | अल्प कालावधी | • जागरुकता मोहिमांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • संदर्भसेवेच्या लाभ घेतलेल्यांची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती. | स्थानिक स्वराज्य संस्था | |
| धोरणात्मक उपाययोजना १.१,१.२,१.३,१.८,१.९ | | | | | | |
| ९. | सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवेची उपलब्धता | राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मानसोपचारतज्ज्ञांची सेवा आणि मानसशास्त्रीय समुपदेशन आणि उपचार सेवा प्रदान करणे. | मध्यम कालावधी | • शासकीय आरोग्य यंत्रणेमध्ये उपलब्ध मानसोपचारतज्ज्ञांची स्थळनिहाय संख्या.<br>• तालुका/प्रभागनिहाय उपलब्ध समुपदेशन केंद्रांची स्थळनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | वैविध्यपूर्ण आणि गरजांवर आधारित मानसिक आरोग्य सेवा आणि परिचर्या जसे की समुपदेशन केंद्रे, मदतीसाठी संपर्क क्रमांक (helpline), संस्थात्मक सेवा इत्यादींसाठी मानके निश्चित करून तपशीलवार | अल्प कालावधी | • लागू केलेली प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती / मार्गदर्शक तत्त्वे/ नियम (SOP).<br>• राज्यातील मानसिक आरोग्य सेवा विषयक चालू असलेल्या मदतीसाठी संपर्क क्रमांकांची (हेल्प लाइन)संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP) / मार्गदर्शक तत्त्वे/ नियम जारी करणे (प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती विकसित करणे) | | | | |
| | | राज्यात मानसिक आरोग्य सेवा व मदतीसाठी संपर्क क्रमांकाची सेवा प्रदान करण्यासाठी नागरिकांचा सहभाग मिळविणे, प्रमाणित तज्ज्ञांना प्रोत्साहन देणे. | मध्यम कालावधी | • अधिकृत सेवा देणाऱ्यांची स्थळनिहाय संख्या.<br>• मानसोपचार आरोग्य सेवा देणाऱ्या प्रमाणित तज्ज्ञांची स्थळनिहाय संख्या.<br>• प्रतिसाद दिलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती.<br>• प्राप्त झालेल्या दूरध्वनींची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती.<br>• प्रतिसाद दिलेल्या दूरध्वनींची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |
| | | मनोरुग्णालयांमध्ये पुरेसे वैद्यकीय कर्मचारी आणि भौतिक | मध्यम कालावधी | • राज्य/ जिल्हा/शहर/ तालुका / नगर आणि प्रभाग निहाय उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवेचे प्रशिक्षण | सार्वजनिक आरोग्य विभाग, | सार्वजनिक बांधकाम विभाग, महिला व बाल |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पायाभूत सुविधांची उपलब्धता करून देणे. | | घेतलेल्या मानसोपचार आरोग्य तज्ज्ञांची संख्या. | स्थानिक स्वराज्य संस्था | विकास विभाग , वित्त व नियोजन विभाग |
| | | राज्यातील मनोरुग्णांसाठी दीर्घकालीन पुनर्वसनाचे विशेष कार्यक्रम विकसित करणे. | मध्यम कालावधी | • सुरू केलेल्या कार्यक्रमांची स्थळनिहाय संख्या.<br>• लाभ घेतलेल्या व्यक्तीची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | राज्यातील मानसिक आरोग्य, समुपदेशन सेवा यावर काम करणाऱ्या सर्व वैद्यकीय आणि शुश्रूषा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे महिलांप्रती संवेदनक्षम करणे. | अल्प कालावधी | • वैद्यकीय आणि शुश्रूषा कर्मचाऱ्यांसाठी चालविलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या.<br>• प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | महिला व बाल विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मानसिक आरोग्या संबंधी रुग्णांमध्ये उपचार घेण्याबाबत असलेले अज्ञान दूर करणे बाबत व्यापक प्रमाणात जाणीव जागृतीचे कार्यक्रम राबविणे. | अल्प कालावधी | • राबविण्यात आलेल्या जागरुकता मोहिमांची स्थळनिहाय संख्या.<br>• माहिती, शिक्षण, संपर्क (IEC) उपक्रम किती व्यक्तींपर्यंत पोहोचला, त्यांची लिंगसमभाव आधारित, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | सार्वजनिक आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय , महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | वैद्यकीय शिक्षणात मानसिक आरोग्यासंबंधी माहिती देण्यावर पुरेसा भर देणे. | अल्प कालावधी | • अभ्यासक्रमाशी जोडलेल्या आणि मानसिक आरोग्य सेवेसंदर्भात तयार केलेल्या प्रकरणांची/ घटकांची (modules) संख्या. | वैद्यकीय शिक्षण विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| धोरणात्मक उपाययोजना १.१,१.२,१.३,१.९,१.१०,१.११ | | | | | | |
| १०. | सर्व वयोगटातील मुलींच्या आणि महिलांच्या पोषण | महिला व मुलींना पूरक पोषण आहाराचा पुरवठा करणे. | अल्प कालावधी | • वय, लिंग आणि उंचीच्या प्रमाणात शरीर वजन निर्देशांक (BMI) ५% हून कमी असलेल्या वय ६-१८ मधील मुलींची टक्केवारी. | महिला व बाल विकास विभाग. स्थानिक स्वराज्य संस्था | सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग, नगर |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | विषयक स्थितीचे सनियंत्रण करणे. | | | • १८.५ कि/मी२ पेक्षा कमी शरीर वजन निर्देशांक असलेल्या वय वर्षे १५ ते ४९ मधील महिलांची टक्केवारी.<br>• किती मुलीं/महिलापर्यंत लाभ पोहचला. स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय माहिती.<br>• जिल्हानिहाय मुलींचा शरीर वजन निर्देशांक तक्ता (BMI) प्रदर्शित केलेल्या शाळाची संख्या.<br>• १९ते ४५ वयोगटातील महिलांचा BMI चार्ट प्रदर्शित केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची जिल्हानिहाय आकडेवारी .<br>• संदर्भ सेवा पुरविण्यात आलेल्या लाभार्थ्यांची लिंग समभाव, स्थळ व सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या.<br>• यासाठी वापरण्यात आलेली सनियंत्रण पद्धती.<br>• जिल्हानिहाय मुली व महिलांच्या आरोग्य व पोषणाची स्थिती | | विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर्शविणाऱ्या नियतकालिक आहवालाची संख्या.<br>• पौष्टिक पदार्थांची निर्मिती, वाटप व देखरेखीसाठी सहभागी महिला स्वयं - साहाय्यता गटाची संख्या. | | |
| | | समाजात महिला आणि मुलींच्या पोषण विषयक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक आणि वर्तणूक बदल अभियानाद्वारे (SBCC) प्रचार प्रसार करणे. | अल्प कालावधी | • राबविण्यात आलेल्या उपक्रमांची स्थळनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या.<br>• उपक्रम किती लोकांपर्यंत पोहचविण्यात आले, त्याची लिंग समभाव, स्थळ आणि सामाजिक प्रवर्गनिहाय स्वतंत्रपणे केलेली संख्या. | महिला व बाल विकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था | सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग |
| | | | | समभाव आधारित वर्गीकरण केलेली संख्या<br>• इयत्ता नववीमधील प्रवेशाच्या वेळी रु.८०००/- मिळालेल्या मुलींची सामाजिक प्रवर्ग, स्थळ, क्षेत्र, लिंग समभाव आधारित वर्गीकरण केलेली संख्या<br>• १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर रु.७५०००/- | | |

परिशिष्ट ३

धोरणात्मक अंमलबजावणी आराखडा-महिलांवरील सर्व प्रकारच्या हिंसेचे निर्मूलन करणे

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| धोरणात्मक उपाययोजना ३.१, ३.२ | | | | | | |
| १ | समाजात महिलांवरील हिंसाचाराविरोधात जाणीव जागृती करणे. | महिलांचे हक्क, महिलांवरील हिंसाचारास प्रतिबंध करणारे कायदे आणि त्यास प्रतिसाद देणारी संस्थात्मक/ प्रशासकीय यंत्रणा इ. बाबींवर लक्ष केंद्रित करणाऱ्या जनजागृती मोहिमेचे आयोजन करणे, यात समाविष्ट आहे:<br>○ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम<br>○ कामाच्या ठिकाणी महिलांचा होणाऱ्या लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) प्रतिबंध अधिनियम<br>○ हुंडा बंदी अधिनियम .<br>○ अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६<br>○ गर्भ लिंग निदान प्रतिबंध कायदा | अल्प कालावधी | • आयोजित करण्यात आलेल्या जाणीव जागृती मोहिमांची संख्या<br>• जाणीव जागृती अभियान पोहोचलेल्यांच्या लिंग समभाव आधारित माहितीचे स्थळनिहाय वर्गीकरण. | महिला व बाल विकास विभाग | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, विधि व न्याय विभाग, गृह विभाग . |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ○ माहिती तंत्रज्ञान अधिनियम (संबंधित कलमे)<br>○ भारतीय दंड विधान ,फौजदारी प्रक्रिया संहिता (यामधील ३७५, ३७६, ३७७ इत्यादी संबंधित कलमे )<br>○ गर्भपात अधिनियम<br>○ बालविवाह प्रतिबंध<br>○ शक्ती कायदा,<br>○ लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२,<br>○ कौटुंबिक न्यायालय कायदा,<br>○ समान वेतन कायदा,<br>○ स्त्रियांचे संपत्तीविषयक विविध कायदे<br>○ महिलांना द्यावयाच्या पोटगीबाबतचे कायदे<br>○ अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायदा<br>○ मदत संपर्क क्रमांक (Help Line)<br>आपत्कालीन आधार यंत्रणा | | | | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हिंसाचारग्रस्त व्यक्तींना मदत व आधार सेवा आणि विविध योजनांशी संबंधित माहिती पुरविण्यासाठी, समाज माध्यमांसह अन्य प्रसार माध्यमांचा कल्पकपणे कृती आराखडा तयार करून तो अंमलात आणणे. | अल्प कालावधी | • सुरू केलेल्या कल्पक माध्यम कृती आराखडा / योजनांची संख्या<br>• समाज माध्यमांद्वारे माहिती पोहचलेल्यांची माहिती. | महिला व बाल विकास विभाग | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, गृह विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| | | जाणीव जागृती मोहिमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध घटकांचा समन्वय साधणे. | अल्प कालावधी | • समन्वय साधण्यात आलेल्या घटकांची संख्या.<br>• विविध सामाजिक संस्था (अशासकीय संस्था, समुदाय आधारित संघटना , विद्यापिठे इ.) यांच्या सोबत केलेल्या भागीदारीची संख्या.<br>• सुरू केलेल्या जाणीव जागृती मोहिमांची संख्या.<br>• विविध भागीदारीमुळे माहिती पोहचलेल्यांची संख्या. | महिला व बाल विकास विभाग | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, गृह विभाग |
| २ | महिलांवरील हिंसाचाराच्या प्रतिबंधासाठी पुरुष व | महिलांवरील हिंसाचाराच्या प्रतिबंधासाठी पुरुषांचे व मुलांचे लक्ष वेधून घेण्याकरिता व त्यांना सहभागी करून घेण्याकरिता योग्य उपक्रम राबविणे. | अल्प कालावधी | • पुरुष व मुलांसाठी सुरू केलेल्या उपक्रमांची संख्या.<br>• पोहचलेल्या पुरुष व मुलांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय गृह विभाग, नगर विकास |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुलांना सहभागी करून घेणे | | | • नागरी समाजाशी केलेल्या भागीदारीची स्थळनिहाय संख्या. | व तंत्र शिक्षण विभाग | विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | महिलांवरील हिंसाचारास प्रतिबंध करण्यासाठी समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहित करणे. | अल्प कालावधी | • महिलांवरीलहिंसाचारास प्रतिबंधकरण्यासाठी समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींच्या माहितीचे लिंग समभाव आधारित वर्गीकरण करणे.<br>• समाजात प्रोत्साहित केलेल्या महिलांवरील हिंसाचारास प्रतिबंधकरण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या<br>• प्रशिक्षित झालेल्या, महिलांवरील हिंसाचारास प्रतिबंधकरण्यासाठी समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या.<br>• आदर्श म्हणून प्रोत्साहित केलेल्या व्यक्तींच्या माहितीचे लिंग समभाव आधारित वर्गीकरण करणे.<br>• प्रोत्साहित केलेल्या आदर्श व्यक्तींची संख्या. | महिला व बाल विकास विभाग | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | महिलांवरील हिंसाचारा (SGBV)ला प्रतिबंध करण्यासाठी जेन्डर समानता संवेदनशील शिक्षण प्रणाली | सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सर्व शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महिलांवरील हिंसाचाराच्या (SGBV) प्रतिबंधात्मक व प्रतिसादासाठी संवेदनशील बनविण्याच्या हेतूने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे. | अल्प कालावधी | • शिक्षण क्षेत्रात लिंग समभाव आधारित हिंसाचाराला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सनद घोषित करणे<br>• घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गांची व कार्यशाळांची शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या.<br>• विविध स्तरावर प्रशिक्षित झालेल्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक स्तर निहाय व स्थळनिहाय वर्गीकरण केलेली माहिती. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , उच्च व तंत्र शिक्षण विभाग वैद्यकीय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग, ग्राम विकास विभाग शालेय शिक्षण मंडळे,विद्यापीठे व व्यावसायिक संस्था |
| | | शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि व्यावसायिक संस्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे, पाठ्यपुस्तकांचे, इतर अध्यापनाचे व शैक्षणिक साहित्याचे नियमित लिंग समानता लेखापरीक्षण करणे. | मध्यम कालावधी | • लिंग समभाव आधारित लेखा परीक्षणांची शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या<br>• लिंग समभाव आधारित लेखा परीक्षणाच्या अहवालांची शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या<br>• केलेल्या प्रत्यक्ष कार्याच्या अहवालांची शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण मंडळे, विद्यापीठे व व्यावसायिक संस्था |
| | | किशोरवयीन मुले व तरुणांसाठी शाळा आणि समुदायांमध्ये (SGBV) | अल्प कालावधी | • विविध स्तरांवर वर्गीकरण केलेल्या लिंग समभाव आधारित मंडळांची | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , उच्च | महिला व बाल विकास विभाग, ग्राम विकास विभाग, |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | महिलांवरील हिंसाचाराविरुद्ध लढण्याची मानसिकता निर्माण करणे.यासाठी सामाजिक नियम, समानता, लैंगिकता, कायदे, सायबर गुन्हे इत्यादीची माहिती किशोरवयीन मुलांना देणे. | | शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या<br>• लिंग समभाव आधारित मंडळांच्या सदस्यांची शैक्षणिक स्तर निहाय व स्थळनिहाय स्वतंत्रपणे गोळा केलेली माहिती.<br>• आयोजित केलेल्या कार्येक्रमांची शैक्षणिक स्तरनिहाय व स्थळनिहाय संख्या. | व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग | आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग |
| ४. | कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम | सर्व सार्वजनिक आणि खाजगी आस्थापना /संस्थांमध्ये लैंगिक छळ प्रतिबंध (POSH) कायद्याअंतर्गत नमूद केल्यानुसार, अंतर्गत समिती (स्थानिक समिती ) ची स्थापना करणे. | अल्प कालावधी | • सार्वजनिक व खाजगी क्षेत्रा नुसार स्थापित केलेल्या अंतर्गत समितींची वर्गवारी.<br>• स्थापित केलेल्या समितीच्या प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अहवालाची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय माहिती. | महिला व बाल विकास विभाग | कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |
| | | कामाच्या ठिकाणी अंतर्गत समिती गठीत केल्याच्या माहितीस पर्याप्त प्रसिद्धी देणे / आस्थापनेच्या दर्शनी भागात फलक लावणे. | अल्प कालावधी | • वापरलेल्या प्रसार माध्यमांची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या | महिला व बाल विकास विभाग | कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • करण्यात आलेल्या प्रचारानुसार स्वतंत्रपणे केलेली संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय माहिती. | | |
| | | सर्व खाजगी व सार्वजनिक संस्थांच्या अंतर्गत समित्यांच्या क्षमता वृद्धिंगत करणे. | अल्प कालावधी | • झालेल्या अंतर्गत समिती प्रशिक्षणांची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या.<br>• आस्थापनांच्या प्रकारानुसार सहभागी व्यक्तींच्या वर्गीकरणाची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या | महिला व बाल विकास विभाग | कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |
| | | प्राप्त प्रकरणांमध्ये प्रतिबंध व निवारण करण्याच्या कामी विहित प्रक्रियेचे अनुपालन करणे. | अल्प कालावधी | • नोंद झालेल्या प्रकरणांची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या.<br>• निकालात काढलेल्या प्रकरणांची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या.<br>• आस्थापनांच्या प्रकारानुसार स्वतंत्रपणे केलेल्या अनुपालन अहवालांची संस्थानिहाय तसेच स्थळनिहाय संख्या | महिला व बाल विकास विभाग | कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |
| | | लैंगिक छळ प्रतिबंध कायद्याअंतर्गत क्षेत्रात/ आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या | अल्प कालावधी | • स्थापन झालेल्या स्थानिक समित्यांची संख्या | महसूल विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला आणि मुलींसाठी स्थानिक समिती (LC) स्थापन करणे. | | • स्थानिक समिती मधील सदस्यांची माहिती प्रसिध्द केली.<br>• स्थानिक समितीस वितरित केलेल्या अनुदानाची जिल्हानिहाय आकडेवारी.<br>• स्थानिक समितीस वितरित केलेल्या अनुदानाच्या खर्चाची जिल्हानिहाय आकडेवारी<br>• स्थानिक समितीच्या सदस्यांसाठी लैंगिक छळ प्रतिबंध (POSH) अधिनियमाचे प्रशिक्षण आयोजित केल्याची जिल्हानिहाय आकडेवारी.<br>• स्थानिक समितीच्या सदस्यांसाठी POSH अधिनियमाच्या आयोजित प्रशिक्षणात सहभागी व्यक्तींची जिल्हानिहाय लिंगभाव आधारित आकडेवारी.<br>• स्थानिक समितीस जिल्हानिहाय उपलब्ध करून दिलेल्या जागेची / सोयीसुविधांची आकडेवारी. | | विशेष साहाय्य विभाग , कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • प्राप्त तक्रारींची स्थळनिहाय तसेच संस्था निहाय संख्या<br>• जमा केलेले / निकालात काढलेले स्थळनिहाय तसेच संस्थानिहाय अहवाल. | | |
| | | कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध, प्रतिषेध व निवारण अधिनियमा अंतर्गत दाखल झालेली प्रकरणे, कार्यवाही झालेली प्रकरणे, प्रकरणनिहाय अदयावत नोंदी व दस्तऐवज ठेवलेल्या प्रकरणांची संख्या | अल्प कालावधी | प्राप्त तक्रारींची स्थळनिहाय तसेच संस्थानिहाय संख्या<br>जमा केलेले / निकालात काढलेले स्थळनिहाय तसेच संस्थानिहाय अहवाल.<br>वार्षिक अहवाल प्रकाशित<br>POSH अधिनियमा अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांचा अहवाल देण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म स्थापित केला आणि त्यास महिला व बाल विकास विभागाच्या च्या सनियंत्रण आणि मूल्यमापन (M&E)प्रणालीशी जोडलेले आहे | महसूल विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग , कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध, प्रतिषेध व निवारण अधिनियम, याच्याशी संबंधित सर्व यंत्रणांचे प्रशिक्षण आयोजित करणे (अंतर्गत समिती आणि स्थानिक समिती सदस्य, महसूल, कामगार, औद्योगिक न्यायालय इ.) | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची स्थळनिहाय, आस्थापनानिहाय व प्रशिक्षणार्थींची स्तरनिहाय संख्या | महिला व बाल विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |
| | पॉश (POSH) कायदा | कायद्यातील काही महत्त्वाच्या सुधारणा | मध्यम कालावधी | • तपशीलवार अभ्यास आणि भागधारकांच्या सल्लामसलतीनंतर कायद्यातील अंमलबजावणीतील आव्हाने आणि तफावतींबाबत केंद्र सरकारसोबत शिफारस शेअर करणे | महिला व बाल विकास विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, कामगार विभाग, औद्योगिक विभाग (सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) |
| ५ | माध्यम व्यावसायिकांमध्ये लिंग समानता संवेदनशीलता वाढविणे/ रुजविणे | प्रसार माध्यमांमध्ये महिला,मुलींच्या लिंगभेदरहित प्रतिनिधित्वासाठी आचारसंहिता व नैतिक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल याची खात्री करणे. | अल्प कालावधी | • प्रसार माध्यमे तसेच स्थळनिहाय वर्गीकृत आचारसंहिता व नैतिक मार्गदर्शक तत्त्वांचे स्थळनिहाय, लिंग समभाव आधारित लेखापरीक्षणाची संख्या. | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | महिला व बालविकास विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • केलेल्या शिफारसी आणि सुचविलेल्या सुधारणांची प्रसार माध्यमे तसेच स्थळनिहाय संख्या<br>• आचारसंहिता व नैतिक मार्गदर्शक तत्त्वांमध्ये केलेल्या शिफारसी आणि सुधारणांची प्रसार माध्यमे तसेच स्थळनिहाय संख्या. | | |
| | | मुद्रित व दृक श्राव्य (Print & Electronस्थानिक समिती ) प्रसार माध्यमे,चित्रपट, फॅशन व जाहिरात उद्योगांमधील विविध माध्यम व्यावसायिकांना जबाबदारीने व लिंग समानता संवेदनशीलतेने बातम्या देण्याबाबत प्रशिक्षण देणे. | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गांची प्रसार माध्यमनिहाय तसेच स्थळनिहाय संख्या<br>• उद्योगाधारित स्वतंत्रपणे दिलेल्या प्रशिक्षणार्थींची प्रसार माध्यमनिहाय तसेच स्थळनिहाय संख्या. | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | महिला व बाल विकास विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग |
| धोरणात्मक उपाययोजना ३.३, ३.४, ३.५, ३.६ | | | | | | |
| ६ | पीडित महिलांसाठी कार्यरत असलेल्या निवारागृहाचे बळकटीकरण करणे. | केंद्र सरकारच्या स्वाधार योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात पुरेशा निवारागृहांची उपलब्धता सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • लोकसंख्येच्या प्रमाणात कार्यान्वित असलेली निवारागृहे<br>• निवारागृहांच्या क्षमतेच्या तुलनेत निवास करणाऱ्या पीडित महिलांची | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळनिहाय संख्या | | |
| | | केंद्र सरकारच्या स्वाधार योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निवारागृहांमध्ये पुरेसा आणि प्रशिक्षित कर्मचारीवर्ग नियुक्त करणे. | अल्प कालावधी | • निवारा गृहांच्या मानव संसाधन स्थितीचा स्थळनिहाय अहवाल<br>• आयोजित केलेल्या समानता प्रशिक्षण वर्गांची जिल्हानिहाय संख्या<br>• सहभागी कर्मचाऱ्यांची लिंग समभाव, जिल्हानिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | सक्षम अधिकाऱ्यांकडून सर्व निवारागृहांमध्ये भौतिक पायाभूत सुविधांचे नियमित लेखापरीक्षण / आकस्मिक तपासणी करणे | अल्प कालावधी | • झालेल्या लेखापरीक्षणांची स्थळनिहाय संख्या<br>• झालेल्या आकस्मिक तपासण्यांची स्थळनिहाय संख्या.<br>• केलेल्या शिफारशींची स्थळनिहाय संख्या<br>• सादर केलेल्या कृती अहवालांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | पीडित महिलांना त्वरित प्रतिसाद / मदत देण्यासाठी, वैद्यकीय ,कायदेशीर सेवा तसेच सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी | अल्प कालावधी | • निर्गमित केलेल्या प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP) | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, विधि व न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | निवारागृहातील कर्मचाऱ्यांसाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती विकसित करणे. | | • कार्यवाही केलेल्या आपत्ती प्रतिसाद प्रकरणांची सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळ निहायसंख्या. | | |
| | | निवारागृह चालविण्याकरिता पुरेसा निधी उपलब्ध होईल व वेळेवर तो उपयोगात येईल हे सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • स्थळनिहाय मंजूर झालेले अंदाजपत्रक.<br>• स्थळनिहाय निधीचा वापर केल्याची टक्केवारी. | महिला व बालविकास विभाग | नियोजन विभाग व वित्त विभाग |
| | | आरोपी महिलांकरिता निवारागृहांचा वापर करण्याऐवजी स्वतंत्र स्थानबद्ध कक्षांची उभारणी करणे. विशेषतः अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या दलाल/ घरवाली (Pimps/ Brothel Keeper) / पासपोर्ट कायद्याचा भंग करणाऱ्या विदेशी महिला इ. | मध्यम कालावधी | • उभारणी झालेल्या स्थानबद्ध कक्षांची स्थळनिहाय संख्या.<br>• विधि संघर्षग्रस्त महिलांची सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळनिहाय संख्या. | गृह विभाग / महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, विधि व न्याय विभाग |
| ७ | सखी केंद्रे (निवारा केंद्रे)/ सखी केंद्रे यांचे बळकटीकरण | सर्व सखी केंद्रे (निवारा केंद्र) २४ x ७ कार्यरत राहतील हे सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • कार्यरत सखी केंद्रांची (निवारा केंद्र) स्थळनिहाय संख्या<br>• उपलब्ध जागेपेक्षा अधिक निवास करणाऱ्यां पीडितांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, विधि व न्याय विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सखी केंद्र (निवारा केंद्र) योजनेच्या राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व सखी केंद्रा (निवारा केंद्र) मध्ये पुरेशा व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे. सर्व पोलिस मुख्यालयेमध्ये भरोसा कक्ष, समुपदेशन कक्ष स्थापन करणे तसेच सर्व सखी एक थांबा केद्र (OSCs) भरोसा कक्षासोबत थेट जोडणे. | अल्प कालावधी | • सखी केंद्रांच्या (निवारा केंद्र) मानव संसाधन स्थितीचा स्थळनिहाय अहवाल<br>• आयोजित केलेल्या समानता प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या<br>• सहभागी कर्मचाऱ्यांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, विधि व न्याय विभाग |
| | | सक्षम अधिकाऱ्यांकडून सर्व One Stop Centre - सखी केंद्र (निवारा केंद्र) मध्ये भौतिक पायाभूत सुविधांचे नियमित लेखा परीक्षण / आकास्मिक तपासणी करणे | अल्प कालावधी | • केलेल्या लेखापरीक्षणांची स्थळनिहाय संख्या<br>• केलेल्या शिफारशींची स्थळनिहाय संख्या<br>• केलेल्या आकास्मिक तपासणीची स्थळनिहाय संख्या<br>• जमा केलेल्या त्रुटी पूर्तता अहवालांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग | गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, विधि व न्याय विभाग |
| | | सखी केंद्रे (निवारा केंद्रे) चालविण्याकरिता पुरेसा निधि उपलब्ध होईल व वेळेवर तो उपयोगात येईल हे सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • मंजूर झालेला स्थळनिहाय निधी<br>• निधीचा वापर केल्याची स्थळनिहाय संख्या<br>• निधीचा वापर केल्याची स्थळनिहाय टक्केवारी. | महिला व बालविकास विभाग | वित्त विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात आणि मुख्यालयात समुपदेशन कक्ष/ भरोसा सेल/ दिलासा कक्ष उभारण्यात येईल. | अल्प कालावधी | • स्थापन केलेल्या समुपदेशन कक्ष/ भरोसा सेल दिलासा कक्षाची स्थळनिहाय संख्या<br>• प्राप्त झालेल्या प्रकरणांची सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळनिहाय संख्या<br>• निकालात काढलेल्या प्रकरणांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | गृह | महिला व बालविकास विभाग |
| ८ | महिला व मुलींकरिता असलेल्या विशेष कक्षांचे बळकटीकरण करणे | सर्व महिला व मुलींकरिता असलेले विशेष कक्ष २४ x ७ कार्यरत राहातील हे सुनिश्चित करणे | अल्प कालावधी | • कार्यरत महिला व मुलांकरिता असलेल्या विशेष कक्षांची स्थळनिहाय संख्या.<br>• दाखल झालेल्या प्रकरणांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या<br>• निकाली काढलेल्या प्रकरणांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | | योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सर्व महिला व मुलींकरिता असलेल्या विशेष कक्षांमध्ये पुरेशा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • मानव संसाधन स्थितीचा स्थळनिहाय अहवाल<br>• आयोजित केलेल्या समानता प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या<br>• सहभागी कर्मचाऱ्यांची सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सक्षम अधिकाऱ्यांकडून महिला व मुलींकरिता असलेल्या विशेष कक्ष योजनेचा नियमित आढावा घेणे | अल्प कालावधी | • घेतलेल्या आढाव्याची स्थळनिहाय संख्या<br>• केलेल्या शिफारशींची स्थळनिहाय संख्या<br>• सादर केलेल्या त्रुटी पूर्तता अहवालांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | वित्त विभाग |
| | | महिला व मुलींकरिता असलेले विशेष कक्ष चालविण्याकरिता पुरेसा निधि उपलब्ध होतील व वेळेवर तो उपयोगात येतील हे सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • स्थळनिहाय मंजूर झालेला निधी<br>• निधीचा वापर केल्याची स्थळनिहाय टक्केवारी.<br>• कंत्राटी आणि नियमित कर्मचाऱ्यांसाठी वेतन समानतेची लिंग समभावनिहाय माहिती<br>• कंत्राटी आणि नियमित कर्मचाऱ्यांनुसार स्वतंत्रपणे केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन संबंधित लिंग समभावनिहाय माहिती . | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | वित्त विभाग, नियोजन विभाग |
| | | आर्थिक व्यवस्थापन व आढावा सुनिश्चित करणे | अल्प कालावधी | • अद्ययावत आर्थिक नियम पुस्तिका<br>• लेखा परीक्षण अहवाल<br>• नियमित आढावा अहवाल | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | वित्त विभाग,नियोजन विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दीर्घकालीन आर्थिक वचनबद्धतेचे समर्थन करणे | अल्प ते मध्यम कालावधी | • केलेल्या लेखी निवेदनांची /याचिकांची संख्या<br>• मंजूर दीर्घकालीन आर्थिक वचनबद्धतेची संख्या | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | वित्त विभाग, नियोजन विभाग |
| ९. | महिलांवरीलहिंसाचाराला (SGBV) प्रतिबंध करण्यासाठी / त्याचा सामना करण्यासाठी मदत क्रमांक (Help Line)कार्यान्वित करणे व भरारी पथकाची स्थापना करणे | केंद्र सरकारच्या १८१ या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यात स्वतंत्र मदत क्रमांक सुरू करणे.<br>सद्यस्थितीत कार्यरत असलेले सर्व मदत क्रमांक २४ x ७ सुरू राहतील हे सुनिश्चित करणे व तात्काळ मदत सुरू करणे. | अल्प कालावधी | • सुरू असलेल्या मदत क्रमांकांची संख्या.<br>• VAW कॉल्स करिता अद्ययावत पोलीस नियमपुस्तिका<br>• दाखल झालेल्या प्रकरणांच्या तुलनेत निकाली काढलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग निहायसंख्या. | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | दूरसंचार विभाग<br>. |
| | | पीडित व्यक्तींचे म्हणणे ऐकून व संवेदनशीलतेने त्यांचे प्रकरण हाताळण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तिची नियुक्ती करणे. | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची संख्या<br>• नियुक्त केलेल्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची सामाजिक प्रवर्गनिहाय, लिंग समभाव आधारित संख्या.<br>• दाखल झालेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळनिहाय संख्या | | |
| | | कार्यरत असलेल्या सर्व मदतीसाठी संपर्क क्रमांकाच्या प्रभावी सनियंत्रणसाठी व प्राप्त झालेल्या माहितीची गोपनीयता जपण्यासाठी प्रणाली कार्यान्वित करणे | अल्प कालावधी | • मदतीसाठी संपर्क क्रमांक निरीक्षण प्रणाली सुरू केली.<br>• माहिती गोपनीयता धोरण निर्गमित करण्यात आले.<br>• सुरू केलेल्या मदतीसाठी संपर्क क्रमांकांची / नियतकालीक निरीक्षण अहवालांची संख्या.<br>• जमा केलेल्या त्रुटी पूर्तता अहवालांची स्थळनिहाय संख्या . | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | माहिती तंत्रज्ञान विभाग, दूरसंचार विभाग |
| | | एक थांबा केंद्र (OSC) §सखी केंद्र व निवारागृहांना सर्व मदत क्रमांकांशी जोडणे. | अल्प कालावधी | • सुरू असलेल्या मदतीसाठी संपर्क क्रमांकांची संख्या<br>• मदतीसाठी संपर्क क्रमांकांशी जोडलेल्या सखी केंद्रांची स्थळनिहाय संख्या.<br>• मदतीसाठी संपर्क क्रमांकांशी जोडलेल्या निवारा गृहांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग | दूरसंचार विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्यातील सर्व टपाल कचेऱ्यांमध्ये कायदेविषयक मदत पेट्यां (Legal Aid Boxes) बसविणे. | मध्यम कालावधी | • स्थापन केलेल्या कायदेविषयक मदत केंद्रांची स्थळनिहाय संख्या<br>• प्राप्त झालेल्या प्रकरणांची लिंग समभाव आधारित , सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या<br>• निकालात काढलेल्या प्रकरणांची लिंग समभाव आधारित , सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | गृह विभाग, विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |
| | | निर्भया पथकांची क्षमता वृद्धी करणे, त्यासाठी आवश्यक ते आर्थिक पाठबळ, मानव संसाधन,क्षमता विकास आणि पायाभूत सोयी सुविधा वृद्धिंगत करणे | अल्प कालावधी | • स्थापना करण्यात आलेल्या निर्भया पथकांची स्थळनिहाय संख्या<br>• स्थळनिहाय मंजूर झालेला निधी<br>• निधीचा वापर केल्याची स्थळनिहाय टक्केवारी<br>• आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची स्थळ निहायसंख्या<br>• सहभागी कर्मचाऱ्यांची लिंग समभाव,स्तर व स्थळनिहाय संख्या<br>• सर्व सोयीयुक्त वाहनांचे वाटप करण्यात आलेल्या निर्भया पथकांची स्थळनिहाय संख्या | | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • अद्यावत तांत्रिक उपकरणांनी सज्ज असलेल्या निर्भया पथकांची स्थळनिहाय संख्या<br>• निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या | | |
| १०. | आपत्कालीन परिस्थितीत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवांचे बळकटीकरण करणे | सर्व प्रतिसाद केंद्रांसह,निवारागृहे,सखी दिलासा केंद्रे, पोलीस ठाणी, न्यायालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे इत्यादी ठिकाणी प्रथमोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा उपलब्ध होतील याची सुनिश्चिती करणे | अल्प कालावधी | • आपत्कालीन काळजी घेण्याबाबत प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (sop)<br>• प्रथोमपचार मदत उपलब्ध असलेल्या प्रतिसाद केंद्रांची स्थळ निहायसंख्या.<br>• आपत्कालीन वैद्यकीय सेवा असणाऱ्या प्रतिसाद केंद्रांची स्थळ निहायसंख्या.<br>• नियमित आढावा घेतलेल्या अहवालांची स्थळनिहाय संख्या<br>• निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, गृह विभाग (कारागृह पोलीस ), विधि व न्याय विभाग |
| | | लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये, एचआयव्ही आणि इतर लैंगिक संबंधांच्या द्वारे संक्रमित होणाऱ्या रोगांना प्रतिबंध | अल्प कालावधी | • आपत्कालीन गर्भनिरोधनाकरिता मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्यात आली. | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | करण्यासाठी आपत्कालीन गर्भनिरोधक व रोग प्रतिबंधक उपचार प्रदान करणे | | • विविध प्रतिसाद केंद्रांमध्ये प्रतिसाद दिलेल्या प्रकरणांची लिंग समभाव आधारित, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | | |
| ११. | महिलांवरील हिंसाचारास बळी पडलेल्या व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांचे बळकटीकरण करणे | महिलांवरील हिंसाचारास बळी पडलेल्या व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या विनामूल्य मानसिक,सामाजिक,कायदेशीर मदत, संदर्भसेवा इ. मिळण्याकरिता प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (sop) बनविण्यात येईल. | अल्प कालावधी | • मनो - सामाजिक, कायदेविषयक मदती साठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती निर्गमित (sop)केली.<br>• विविध ठिकाणी पुरविण्यात आलेल्या संदर्भ सेवांची स्वतंत्रपणे केलेली माहिती.<br>• निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | गृह (कारागृह पोलीस ), विधि व न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, , जिल्हा प्रशासन |
| | | (SGBV)महिलावरील हिंसाचाराच्या पीडित व्यक्तींना विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्यासाठी जिल्हा स्तरावर एक खिडकी योजना सुरु करणे. | मध्यम कालावधी | • एक खिडकी योजना सुरु केलेल्या जिल्ह्यांची संख्या<br>• निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग, विधि व न्याय विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व राज्य शासन संचालित समुपदेशन केंद्रांचे बळकटीकरण करणे व नवीन समुपदेशन केंद्रांना मान्यता देणे. | मध्यम कालावधी | • विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त समुपदेशन केंद्रांची संख्या.<br>• हाताळलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग,सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | गृह (कारागृह पोलीस), विधि व न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन |
| | | कारागृह, पोलीस ठाणे,हॉस्पिटल,न्यायालय, निवारागृह इत्यादिं मध्ये मान्यताप्राप्त समुपदेशकांची व सामाजिक कार्यकर्त्यांची नियुक्ती करणे. | अल्प कालावधी | • विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त समुपदेशकांची स्थळ, संस्थानिहाय संख्या<br>• विविध आस्थापनांमध्ये जिल्हानिहाय कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त सामाजिक कार्यकर्त्यांची स्थळ, संस्थानिहाय संख्या.<br>• कार्यवाही केलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग<br>सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | गृह (कारागृह पोलीस ), विधि व न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन |
| | | पालकत्वाच्या नात्याने पीडित व्यक्तीची काळजी घेण्यासाठी राज्यात पालक संगोपन (फॉस्टर केअर), नातेवाईकांकडे होणारे संगोपन (किनशिप केअर) इ. | अल्प कालावधी | • हिंसाचाराने पीडित व्यक्तींची पर्यायी काळजी घेण्यासाठी निर्गमित केलेला शासन निर्णय | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | गृह (कारागृह पोलीस ), विधि व न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकल्पांची उभारणी करणे/ अंमलबजावणी करणे | | • राज्याने पीडितांची पर्यायी काळजी घेण्यासाठी विकसित केलेल्या मॉडेलची संख्या.<br>• सेवा पुरविण्यात आलेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या. | | |
| १२. | वैद्यकीय कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी | सार्वजनिक आणि खाजगी वैद्यकीय क्षेत्रातील परिचारिका, इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य प्रशिक्षणाची सुनिश्चिती करणे | अल्प कालावधी | • वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गाची संस्था व स्थळनिहाय संख्या.<br>• प्रशिक्षित झालेल्या वैद्यकीय व्यावसायिकांची लिंग समभाव आधारित व स्थळनिहाय संख्या . | सार्वजनिक आरोग्य विभाग | महिला व बालविकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| | | महिलांवरील हिंसाचाराच्या विरोधात प्राथमिक सामना व प्रतिबंध करण्यासाठी सामाजिक निकष आणि कायद्यांच्या आधारे राज्यातील अंगणवाडी सेविका,बचत गटाच्या सदस्य यांची क्षमता वृद्धिंगत करणे. | अल्प कालावधी | • प्रशिक्षित झालेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांची स्थळनिहाय संख्या<br>• प्रशिक्षित झालेल्या बचत गटातील समानता प्रवर्तकांची स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग | ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग |
| १३. | पोलीस कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी | महिलांवरील हिंसाचाराच्या विरोधात प्रत्येक ठिकाणी योग्य तो सामना करण्यासाठी क्षमता वाढविणे. | अल्प कालावधी | • गुन्ह्यांचा जेन्डर समानता संवेदनशील तपास होण्यासाठी | गृह विभाग | महिला व बालविकास विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP) निर्गमित करण्यात आल्या.<br>• पायाभूत प्रशिक्षण अभ्यासक्रमात महिलांवरील हिंसाचाराच्या विरोधात सामना करण्यासाठी घटक समाविष्ट करण्यात आला.<br>• पोलीस प्रशिक्षणात सायबर गुन्ह्यांबाबत घटक समाविष्ट करण्यात आला.<br>• पोलीस प्रशिक्षणात न्यायवैद्यक(Forensस्थानिक समिती ) / पुरावे गोळा करण्याबाबत घटक समाविष्ट करण्यात आला.<br>• पोलीस प्रशिक्षणात मानव तस्करी कायद्याबाबत जाणीव जागृती करणारे घटक समाविष्ट करण्यात आले.<br>• पार पाडलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या<br>• प्रत्येक प्रशिक्षण वर्गांत सहभागींची लिंग समभाव आधारित व स्थळनिहाय संख्या. | | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये जेन्डर समानता संवेदनशीलता वाढविण्यासाठी प्रमाणित प्रशिक्षण अनिवार्य करणे. | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रमाणित प्रशिक्षणांची स्थळनिहाय संख्या.<br>• जिल्हानिहाय प्रशिक्षित झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची लिंग समभाव आधारित स्तर व स्थळनिहाय संख्या.<br>• प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची लिंग समभाव आधारित स्तर व स्थळनिहाय संख्या . | गृह | महिला व बालविकास विभाग |
| धोरणात्मक उपाययोजना ३.२, ३.३, ३.४, ३.५, | | | | | | |
| १४. | लिंग समानता संवेदनशील न्यायवैद्यक प्रणाली | सर्व पोलीस ठाण्यात कार्यरत प्रशिक्षित महिला समुपदेशक यांची नियुक्ती करणे | अल्प कालावधी | • पोलीस स्टेशन निहाय स्थापन केलेल्या महिला समुपदेशन केंद्रांची (Womens Cell) संख्या<br>• पोलीस ठाण्यानुसार नियुक्त केलेल्या महिला कर्मचारी संख्या.<br>• आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या<br>• न्यायवैद्यकीय प्रणालीमध्ये प्रशिक्षित झालेल्या कर्मचाऱ्यांची लिंग समभाव आधारित व स्थळनिहाय संख्या. | गृह विभाग | विधि व न्याय विभाग, महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | न्यायवैद्यकीय दस्तऐवजीकरणासाठी लिंग समानता संवेदनशील शिष्टाचार प्रणाली (protocol) लागू करणे | अल्प कालावधी | • न्यायवैद्यकीय दस्तऐवजीकरणासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP) निर्गमित करण्यात आला.<br>• लैंगिक हिंसाचाराने पीडित व्यक्तींची (प्रतिबंधित) दोन बोटे चाचणीची शून्य प्रकरणे.<br>• प्रकरण व्यवस्थापनाचे नियमित पुनरावलोकन. | गृह विभाग , सार्वजनिक आरोग्य विभाग | विधि व न्याय विभाग , महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |
| | | सर्व जिल्ह्यांमध्ये विधि विषयक मदत केंद्रांची (LAC) ची स्थापना व बळकटीकरण करणे. | अल्प कालावधी | • जिल्हयानुसार कार्यरत विधि मदत केंद्रांची स्थळनिहाय संख्या<br>• विधि मदत केंद्रांकरिता मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली.<br>• मदत केलेल्या प्रकरणांची स्थळनिहाय संख्या.<br>• विधि मदत केंद्रांमध्ये नियुक्त केलेल्या वकिलांची केंद्रनिहाय संख्या.<br>• विधि मदत केंद्रांनुसार नियुक्त केलेल्या प्रशिक्षित (Para legal) विधि स्वयंसेवकांची केंद्रनिहाय आकडेवारी. | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • विधि मदत केंद्रांकरिता मंजूर केलेल्या वार्षिक निधीची केंद्रनिहाय आकडेवारी.<br>• वापरण्यात आलेल्या निधीची केंद्रनिहाय टक्केवारी. | | |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व जिल्ह्यांमध्ये महिला दक्षता समित्या (MSS) स्थापन करणे आणि सक्रिय करणे. | अल्प कालावधी | • जिल्हानिहाय घटित केलेल्या कार्यरत महिला दक्षता समित्यांची संख्या.<br>• महिला दक्षता समिती मधील सदस्यांना दिलेल्या प्रशिक्षणाची जिल्हानिहाय संख्या.<br>• प्रशिक्षणात सहभागी महिला दक्षता समितीच्या सदस्यांची जिल्हानिहाय संख्या.<br>• मदत केलेल्या प्रकरणांची जिल्हानिहायसंख्या. | महिला व बालविकास विभाग | जिल्हा प्रशासन |
| १५. | कायद्याची प्रभावी अंमलबजावणी | महिलांवरील हिंसाचाराच्या विरोधातील (SGBV) संबंधित सर्व विद्यमान कायद्यांच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय कृती पथकाची (DTF) स्थापना करणे. | मध्यम कालावधी | • स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय कृती पथकाची संख्या<br>• आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कृती पथकाच्या बैठकींची स्थळनिहाय संख्या.<br>• केलेल्या त्रुटीपूर्तता अहवालांची स्थळनिहाय संख्या<br>• महिलांवरील हिंसाचार कायद्यांचे जिल्हास्तरीय कृती पथकाद्वारे | विधि व न्याय विभाग, | महिला व बालविकास विभाग, गृह विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केलेल्या नियमित पुनरावलोकनाची स्थळनिहाय माहिती | | |
| | | बालविवाहाच्या प्रकरणांची त्वरित माहिती मिळवणे, त्यांचा शोध घेणे व त्याला त्वरित प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे. | अल्प कालावधी | • स्थळनिहाय बाल विवाहांची माहिती मिळवणे, शोध घेणे व त्याला थांबविण्यासाठी स्थापन केलेल्या यंत्रणांची माहिती<br>• सेवा पुरविण्यात आलेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय, स्थळनिहाय संख्या. | विधि व न्याय विभाग , गृह विभाग | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग , ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, जिल्हा प्रशासन |
| १६. | लिंग समानता संवेदनशील न्याय व्यवस्था | महिलांवरील हिंसाचाराच्या प्रकरणांचा विहित काल मर्यादेत निपटारा करण्यासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP) विकसित करण्यात यावी. | अल्प कालावधी | • निर्गमित केलेल्या प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (SOP)<br>• दाखल प्रकरणांच्या तुलनेत गुन्हा सिद्ध झालेल्या प्रकरणांची न्यायालय आणि स्थळनिहाय संख्या.<br>• न्यायालयीन कर्मचाऱ्यांकरिता वागणुकीतील शिष्टाचार प्रणाली बंधनकारक करण्यात आला.<br>• पीडित व्यक्तींकरिता दृकश्राव्य बैठकींच्या सुविधेसाठी निधीची तरतूद करणे. | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • दृकश्राव्य बैठकींच्या मदतीने सुनावणी झालेल्या बैठकींची स्थळनिहाय संख्या . | | |
| | | दाखल प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना करणे. | अल्प कालावधी | • स्थळनिहाय जलदगती न्यायालय स्थापन केल्याची संख्या<br>• न्यायालयनिहाय कार्यवाही केलेल्या प्रकरणांची संख्या | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), गृह विभाग |
| | | न्यायाधीशांच्या व इतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या वेळेवर होतील हे सुनिश्चित करणे. | अल्प कालावधी | • न्यायालयानुसार नियुक्त केलेल्या न्यायाधीशांच्या व विधि कर्मचाऱ्यांच्या मानव संसाधन स्थितीचा वार्षिक अहवाल. | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण(DLSA), गृह विभाग |
| | | पीडित व साक्षीदार संरक्षण कार्यक्रमांची सुरुवात आणि अंमलबजावणी करणे | मध्यम कालावधी | • पीडित व साक्षीदार संरक्षण या कार्यक्रमाकरिता शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.<br>• मदत केलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या. | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), गृह विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व ठिकाणी प्रशिक्षित संरक्षण अधिकारी (PO) नियुक्त करणे. | अल्प कालावधी | • जिल्हानिहाय नियुक्त केलेल्या प्रशिक्षित संरक्षण अधिकाऱ्यांची संख्या<br>• आयोजित केलेल्या प्रशिक्षित संरक्षण अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण वर्गांची स्थळनिहाय संख्या<br>• मदत केलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग, स्थळनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग | , जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), गृह विभाग |
| | | महिलांवरील हिंसाचारास प्रतिबंध करणाऱ्या विविध कायद्याच्या अंमलबजावणीच्या न्यायिक पर्यवेक्षणासाठी राज्यस्तरीय समिती तयार करणे(उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या निगराणीखाली) | अल्प कालावधी | • न्यायिक पर्यवेक्षणासाठी राज्यस्तरीय समिति बनविण्यात आली.<br>• झालेल्या बैठकींची संख्या<br>• केलेल्या शिफारशींची संख्या | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), गृह विभाग |
| | | आंतरराज्य गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी निधीची पुरेशी तरतूद सुनिश्चित करणे. | मध्यम कालावधी | • वार्षिक निधीची तरतूद<br>• तपास केलेल्या आंतरराज्य गुन्ह्यांची संख्या<br>• आंतरराज्य गुन्ह्यांमध्ये आरोपी दोषी ठरलेल्यांचीटक्केवारी | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण (DLSA), गृह विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | न्यायव्यवस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी लिंग समानता संवेदनशील प्रशिक्षण अनिवार्य करणे. | अल्प कालावधी | • आयोजित केलेल्या प्रशिक्षणांची न्यायालयानुसार संख्या.<br>• लिंग समभाव आधारित आणि स्तर निहाय आयोजित केलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या.<br>• शासकीय अभियोक्त्यांसाठी बनविलेल्या विशेष प्रशिक्षण घटकांची संख्या<br>• लिंग समभाव आधारित आणि स्तर निहाय प्रशिक्षित केलेल्या शासकीय अभियोक्त्यांची संख्या. | विधि व न्याय विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा प्रशासन |
| धोरणात्मक उपाययोजना ३.३, ३.७ | | | | | | |
| १७. | पीडितांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी सुलभ प्रक्रिया तयार करणे. | सर्व निवारागृहे, सखी दिलासा केंद्रे, पोलीस स्टेशन, कारागृहे, न्यायालये, हॉस्पिटल,इतर संबंधित संस्थांमध्ये नुकसानभरपाई व पुनर्वसन कार्यक्रमांची माहिती पुरेशा प्रमाणात प्रसिद्ध केली जाईल. | अल्प कालावधी | • नुकसान भरपाई व पुनर्वसन यावर माहिती, शिक्षण व संसूचना (IEC) साहित्य बनविले.<br>• स्थळांनुसार व संस्थांनुसार प्रदर्शित केलेल्या माहिती, शिक्षण व संसूचना (IEC) साहित्याची माहिती | महिला व बालविकास विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | गृह विभाग, |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र व राज्य शासनामार्फत पीडित व्यक्तींसाठी नुकसान भरपाईच्या योजना व सेवा यांच्यात विरोधाभास निर्माण होऊ नये म्हणून विविध शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधणे व त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. जसे की, राज्य शासनाची मनोधैर्य योजना, पीडितांना अर्थसाहाय्य देणारी केंद्राची योजना यासाठी एक खिडकी योजना सुरु करावी. | अल्प कालावधी | • पीडित व्यक्तींना नुकसान भरपाई प्रदान केलेल्या प्रकरणांची स्थळनिहाय संख्या<br>• नुकसानभरपाई मिळालेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय माहिती<br>• पीडितांना अर्थसाहाय्य देण्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित केलेल्यांची स्थळनिहाय संख्या | गृह विभाग, महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | विधि व न्याय विभाग, जिल्हा प्रशासन |
| | | लैंगिक शोषणासंबंधी तसेच इतर मानवी तस्करीला बळी पडलेल्या पीडितांना द्यावायच्या अर्थ सहाय्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा वाढविणे | अल्प कालावधी | • शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.<br>• आर्थिक साहाय्य मिळालेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या. | गृह विभाग, महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | विधि व न्याय विभाग, जिल्हा प्रशासन |
| | | पीडितांना आर्थिक मदत मिळण्यास उशीर झाल्यास किंवा नकार मिळाल्यास त्याच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी एक यंत्रणा विकसित करण्यात येईल | अल्प कालावधी | • शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.<br>• निकाल लागलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या. | गृह विभाग, महिला व बालविकास विभाग, सामाजिक | विधि व न्याय विभाग, जिल्हा प्रशासन |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | न्याय व विशेष साहाय्य विभाग | |
| | | केंद्र शासनाच्या निर्भया योजनेच्या निधीचा असुरक्षित गटातील व्यक्तींना सुविधा पुरविण्या साठी प्रभावी वापर करणे. | अल्प कालावधी | • निर्भया योजनेंतर्गत आर्थिक वर्षनिहाय महिला व बाल विकास विभागास उपलब्ध करून देण्यात आलेला निधी<br>• आर्थिक साहाय्य मिळालेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या.<br>• निर्भया निधीतून उभारण्यात आलेल्या सोयी सुविधांची स्थळनिहाय संख्या | गृह विभाग , महिला व बालविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | विधि व न्याय विभाग, जिल्हा प्रशासन |
| १८. | महिलांवरील हिंसाचारातून वाचलेल्या पीडितांचे दीर्घकालीन पुनर्वसन | शिक्षण पूर्ववत सुरू राहील यासाठी पीडितेस आवश्यक ते साहाय्य पुरविणे. | मध्यम कालावधी | • जिल्हानिहाय मदत केलेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | महिला व बालविकास विभाग, जिल्हा प्रशासन, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कौशल्य विकास साधण्यासाठी पीडितेस आवश्यक ते सर्व सहकार्य करणे. | मध्यम कालावधी | • प्रशिक्षण दिलेल्या पीडितांची लिंग समभाव, स्थळ, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या.<br>• प्रशिक्षण प्रमाणपत्र दिलेल्या पीडितांची स्थळ, लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या.<br>• जिल्हानिहाय प्रशिक्षण घेऊन रोजगार मिळालेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | कौशल्य व उद्योजकता विकास विभाग (SDED) | महिला व बालविकास विभाग, जिल्हा प्रशासन , आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग , सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |
| | | पीडितांना शाश्वत उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता होईल याची सुनिश्चिती करणे. | मध्यम कालावधी | • लिंग समभाव आधारित हिंसेच्या पीडितांसाठी राबविण्यात आलेले उपजीविकेचे / रोजगाराचे उपक्रम<br>• जिल्हानिहाय उपजीविकेचे साधन प्राप्त झालेल्या पीडितांची लिंग समभाव,क्षेत्र, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | आदिवासी विकास विभाग , ग्राम विकास विभाग , नगर विकास विभाग , उद्योग विभाग , सांस्कृतिक कार्य विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग , कामगार विभाग |
| | | पीडितांना अल्प व दीर्घ कालीन निवारागृहांची उपलब्धता होईल याची सुनिश्चिती करणे | अल्प कालावधी | • जिल्हानिहाय निवारा उपलब्ध करून दिलेल्या पीडितांची लिंग | महिला व बालविकास विभाग , सामाजिक न्याय | गृह विभाग , आदिवासी विकास विभाग , ग्राम |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | समभाव,संस्था व सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या | व विशेष साहाय्य विभाग | विकास विभाग , नगर विकास विभाग, |
| | | पीडितांना सार्वजनिक सेवा व नागरी हक्कांची उपलब्धता होईल याची सुनिश्चिती करणे. | अल्प कालावधी | • बँक खाती असलेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या.<br>• निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, आधार कार्ड, पॅन असलेल्या पीडितांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |
| | | स्वाधार गृहांमध्ये महिलांवरील हिंसाचारास बळी पडलेल्या महिलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल. | अल्प कालावधी | • स्वाधार गृहांमध्ये महिलांवरील हिंसाचारास बळी पडलेल्या महिलांना उपलब्ध करून दिलेल्या प्रवेशांची (Seats) संख्या<br>• स्वाधार गृहांमध्ये प्रवेश दिलेल्या पीडितांची सामाजिक प्रवर्ग व स्थळनिहाय संख्या | महिला व बालविकास विभाग, | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग |
| | | महिला दक्षता समिती आणि विधि साहाय्य केंद्रांना भेट देणाऱ्या पीडितांचा सक्षम यंत्रणेकडून पुरेसा पाठपुरावा करणे. | अल्प कालावधी | • जिल्हानिहाय पाठपुरावा केलेल्या प्रकरणांची लिंग समभाव, सामाजिक प्रवर्गनिहाय संख्या. | महिला व बालविकास विभाग, सामाजिक | विधि व न्याय विभाग , जिल्हा प्रशासन |

| अनु . क्र | विशेष लक्ष केंद्रित करावयाच्या सेवा/ बाबी | कृती | कालावधी | संनियंत्रणाचे निर्देशांक | अंमलबजावणी करणारा प्रमुख विभाग | सहयोगी विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | न्याय व विशेष साहाय्य विभाग, | |
